
वृषाली जोशी

# जॉन ओ'हारा



## गुप्त सभा व इतर कथा

# गुप्त सभा व इतर कथा

मूळ लेखक – जॉन ओ’हारा

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# गुप्त सभा व इतर कथा

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

### आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# गुप्त सभा व इतर कथा

लेखक : जॉन ओ’हारा

अनुवादक: डॉ. वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : १० डिसेंबर २०२२



©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# गुप्त सभा व इतर कथा

## लेखक जॉन ओ’हारा यांची माहिती

## कथानुक्रम


1. गुप्त सभा
2. आदर्श मनुष्य
3. तुला इथे आवडले का?
4. चुका नाहीत
5. आता आम्हाला माहिती झाले
6. डॉक्टर आणि मिसेस पार्सन्स
7. मऊ चामड्याचे बूट

# जॉन ओ’हारा



जॉन ओ’हारा हा १९०५ मध्ये पॉट्सव्हील, येथे जन्मलेला अमेरिकन लेखक होता. त्याची पूर्वपीठीका आयरिश कॅथॉलिक होती. त्याने काही नाटके व निबंधदेखील लिहिले होते. वडील लवकर वारल्याने त्याला कॉलेजला जाता आले नाही. सुरवातीला त्याने न्यूयॉर्कमधील विविध वर्तमानपत्रांचा बातमीदार म्हणून काम केले. न्यू यॉर्कर मध्ये त्याच्या लघुकथा छापून येत असत. पुढे त्याने कादंबऱ्याही लिहिल्या. त्याने वयाची तिशी

गाठण्यापूर्वीच त्याच्या पुस्तकांचा प्रचंड खप झाला. अमेरिकेतील सामाजिक व भौगोलिक समाजाच्या तिर्यक छेदातील अनेक व्यक्तींचे व प्रसंगांचे सहजतेने केलेले चित्रण त्याच्या कथांमध्ये येते. तो उत्तम संवादलेखक होता. त्याने हॉलीवूडच्या अनेक सिनेमांचे पटकथा लेखन केलेले होते व तो इतरांच्या पटकथा दुरुस्त देखील करत असे. दुसऱ्या महायुद्धात तो नेव्हीत होता. त्यानंतर त्याने पूर्ण वेळ लेखन सुरु केले. तो गोल्फ व टेनिस खेळे. 'Ten North Frederick' या पुस्तकासाठी त्याला 'National Book Award' मिळाले होते. १९७० मध्ये तो न्यू जर्सी येथे मरण पावला.

# SECRET MEETING

# गुप्त सभा



इबेन टाउनसेंड त्याची जेवणानंतरची सिगरेट ओढत दाराजवळील बंदिस्त भागात बसला होता, तेव्हा त्याने फोन वाजलेला ऐकला. त्याच्या बायकोने तो उचलला व ती बोलली. तिने त्याला हाक मारली. "जो ट्रॅव्हर्स, तुझ्यासाठी."

"ओहो, काय त्रास आहे!" असे म्हणत तो फोनशी गेला. "त्याला काय हवे आहे?" जो ट्रॅव्हर्सला काय हवे होते, ते त्याला माहिती होते.

"इबेन? --- जो. सभेला येत नाही आहेस का?" ट्रॅव्हर्सचा आवाज तडफदार होता.

"कसली सभा, जो?"

“तुला माहिती आहे. डॉक बुशमिलसंबंधीची बोर्डसभा. इबेन, तू सोडून सगळे इथे आहेत.” ट्रॅव्हर्स थांबला.

“ओहो, हो. बरोबर. मी कोट घालून लगेच येतो.”

ट्रॅव्हर्स बोलला, “तू आल्याशिवाय आम्ही सुरु करणार नाही.”

इबेन म्हणाला, “फक्त पाच मिनिटे थांब. विशेष शाळेची बोर्डसभा. मी विसरलो.” त्याने त्याच्या बायकोला स्पष्टीकरण दिले.

त्याची बायको म्हणाली, “विसरलास? हं, मी एक डॉलरची पैज लावते, ही गुप्त सभा आहे आणि तू ती टाळायचा प्रयत्न करतो आहेस. ती याबद्दल आहे --- “

इबेन बोलला, “जर ती गुप्त आहे, तर गुप्तच ठेव. तो वर गेला व झोपायच्या स्लीपर्सपासून बुटांपर्यंत सगळे बदलले. टाय लावला. कोट घातला. दरवाज्याजवळील टेबलावरील त्याची काड्यांची टोपी घातली. आणि बोर्डसभा  असलेल्या हायस्कूलच्या इमारतीकडे चालू लागला.

टप खाली करून त्याने स्टेशन वॅगन गाडी सिनेमागृहाजवळ उभी केली.  नेहमीपेक्षा या ऋतुत, उन्हाळयात, लवकर इथे आलेले खूप लोक सातच्या सिनेमाच्या खेळासाठी आले होते. पुढील चौरस्त्यात इबेन ओळखत होता, अशी बरीचशी हायस्कूलची मुले मुली औषधाच्या दुकानासमोर उभी होती. त्यांना टाळण्यासाठी  इबेनने रस्ता बदलला.

त्यांना बहुधा माहिती नव्हते, की आज शाळेची सभा होती. पण लवकरच सभा होणार आहे, एवढे त्यांना माहिती होते. तो पुढच्या कोपऱ्यावर वळला व मागील रस्त्याने, शाळेच्या इमारतीकडे गेला.

इमारत बघितल्यावर त्याला प्रचंड राग आला. सर्व पहिला मजला उजळून निघाला होता. गुप्त सभा घ्यायची ही काय सुंदर पद्धत होती!

इमारतीच्या मागील बाजूस असलेल्या बोर्डसभेच्या खोलीच्या वाटेवर असलेल्या त्याच्यासाठी कुणीतरी दिवे लावले व ते तसेच ठेवले. इबेन मागील दाराकडे गेला. ते सभेसाठी उघडे होते.

बोर्डाचे इतर सहा सभासद लांब टेबलाच्या भोवती एका टोकाला बसले होते. ही खोली शिक्षकांसाठीच्या सभेसाठी वापरली जात होती. पण टेबल फारच लांब होते. बँकेतील रोखपाल इबेनने हे प्रथम लक्षात आणून दिले. इतर सभासदांनी इबेनचे स्वागत केले. जो ट्रॅव्हर्सने टेबलाच्या दोन्ही बाजूंकडील सभासदांकडे मान हलवून बघून, त्याचा घसा खाखरून, त्याच्या बोटांची टोके टेबलावर ठेऊन, लगेच सभेचे कामकाज सुरु केले.

इबेन म्हणाला, “जो, एक मिनिट, जर ही गुप्त सभा असेल, तर सगळी इमारत उजळून, तू तिची जाहिरात का केलीस, हे मला समजले नाही.”

“इबेन, तुझे बरोबर आहे. पण त्रास झाला आहे. म्हणून आपण ते दिवे चालू ठेवले आहेत. शेवटी कदाचित ही सभा गुप्त राखणे चांगले असेल. पण आसपासच्या उजेडाच्या घरांशी मिळतेजुळते घेऊन, तो उद्देश बहुधा जास्त चांगला सफल होईल. खूप लोक ही सभा खासगी घरात घेण्याची अपेक्षा करत होते. मी काय म्हणतो आहे, हे तुला समजले असेल. ती अशा उजळलेल्या जागी घेऊन, बऱ्याच लोकांना कदाचित ती चालली असल्याचे समजणार नाही. तरीही --- “ त्याने काही चावत असल्यासारखे, त्याचे तोंड वळवले आणि थोडे थांबून पुन्हा बोलणे चालू केले. “ही सभा शाळेत घेण्यापेक्षा खासगी घरात घेण्याचे चांगले कारण ठरले असते. ही नियमबाह्य सभा आहे आणि ती इथे घेण्याने, ती नियमानुसार आहे, असे वाटण्याची शक्यता आहे. तर ते तसे नाही. मी सभा सुरु करायची आज्ञा देत नाही. सभेमध्ये काय घडले हे लिहून काढायची गरज नाही. सभेसाठीचा हातोडा

माझ्या खणात आहे. तो तिथेच राहील. खरे तर, मी उभादेखील रहाणार नाही आहे. मी काय करेन, तर चर्चेला सुरवात करून देईन. सभेचा मुख्य असा कोणी नाही. आपण ती साध्या खेळकरपणे घेऊ.”

इबेन म्हणाला, “तर मग ती सुरु करा आणि संपवा.

जो म्हणाला, “अगदी अथपासून सुरवात करणे, मला आवडेल. नशीबाने आपली एकुलती एक स्त्री सभासद ही विवाहित स्त्री आहे. खरे तर आजी आहे. त्यामुळे आपण इतर वेळेपेक्षा जास्त मोकळेपणे बोलू शकू. मिसेस ड्रेटॉन ल्युसी, मी अशी आशा करतो, की तुम्ही मोकळया चर्चेच्या तयारीने आला आहात.”

ल्युसी ड्रेटॉनने मान हलवली.

जो म्हणाला, “आपल्याकडे फार वाईट परिस्थिती तयार झाली आहे. मी काही नावांचा उल्लेख करणार नाही, पण आपल्या सर्वांना परिस्थिती माहिती आहे. आपल्या शिक्षकांपैकी एकाला दोन गुन्हे केल्याबद्दल दोषी ठरवण्यात आले आहे किंवा निदान आरोप करण्यात आले आहेत. एक, म्हणजे रात्री च्या सुरवातीला, दारू पिऊन धिंगाणा घातल्याबद्दल लोकांकडून समज देण्यात आली. दुसरे म्हणजे अशा अवस्थेत, शाळेच्या परिसरात तरूण विद्यार्थिनीकडे वाईट नजरेने बघितल्याबद्दल, दोष देण्यात आला. शाळेची सहामाही संपायच्या सुमारास, हे घडले. साधारण दोन आठवड्यांपूर्वी घडले आणि ऑगस्टशिवाय नियमाप्रमाणे आपल्याला सभा घ्यायला परवानगी नाही. पण आपल्या सर्वांनाच शिव्याशाप देणारी खूप निनावी पत्रे आली आहेत. त्यामुळे आपले लक्ष या शिक्षकाकडे वेधले गेले आहे. एरवी आपण असली पत्रे कचऱ्यात टाकून दिली असती. पण आपल्या शाळेची नैतिकतेची

कसोटी लागते, तेव्हा आपण असे करू शकत नाही. ही वेगळी परिस्थिती ठरते.

“तर आता, मी याला खेळीमेळीचे, कायदेशीर नसलेले भेटणे म्हणतो. अशा परिस्थितीत आपण काय करावे, हे ठरवण्यासाठी ही सभा आहे. आपण आपल्याला कुणा अधिकाऱ्याचे पत्र आले, तर आपण काही करायचे की कसे, हे बघायला हवे. व्यक्तिशः मी काय करेन, तर मी त्याला लाथ मारून, नोकरीतून काढून टाकेन आणि त्याला अमेरिकेतील इतर कुठल्याही शाळेत काम मिळणार नाही, असे बघेन.”

जो ट्रॅव्हर्सचे बोलून संपले. तिथे मोठी शांतता पसरली. सर्व सभासद जोकडे व इतरांकडे बघत राहिले. पण कुणीच काही बोलेना. शेवटी जो म्हणाला, “इबेन, तुझे काय? मी चर्चेला तोंड फोडले आहे. पण आपले काहीच ठरत नाही. आपण उन्हाळ्यातील या आल्हादक संध्याकाळी नुसतेच बसलो आहोत.

इबेन म्हणाला, “असो. मला नवल कसले वाटते, तर आपल्याला कुठे पोचायचे आहे? त्या शिक्षकाविरुद्ध काहीही लेखी आरोप केले गेलेले नाहीत.”

मिसेस ड्रेटॉन म्हणाली, “जो, तू स्वतःच तर म्हणालास, की ती निनावी पत्रे होती --- “

सर्वात जुना सभासद, सॅम लोके बोलला, “आपल्याला काय माहिती आहे? आपल्याकडे काय पुरावा आहे? मी तो शिक्षक दारू पिऊन झिंगल्याचे ऐकले. बाकी काहीही कोणी मला बोलले नाही. फक्त निनावी पत्रे! ती मी फेकून दिली.”

जो म्हणाला, “एक मिनिट थांबा. मी कुणाहीसारखा निनावी पत्रांच्या विरुद्ध आहे. फक्त जर ते --- ठीक आहे, जिथे जिथे धूर आहे तिथे तिथे अग्नी असणारच.”

औषध दुकानदार, एड वेल्स बोलला, “हे ठीक आहे की हे सर्व बोलणे म्हणजे काही अधिकृत सभा नाही, बरोबर? ठीक आहे, सर्व काही घडून गेल्यावर त्या रात्री तो शिक्षक मला दिसला. अनधिकृतपणे, त्याला बघितल्यावर तो मला बराच झिंगलेला वाटला. अर्थात मी रात्रीची सुट्टी घेतली होती. पण माझा नवीन मदतनीस, फ्रँक जेव्हा दुकानाला कुलूप लावत होता, तेव्हा मी परत तिथे गेलो. तो शिक्षक माझ्या दुकानासमोर उभा होता. तो चवड्यावर व टाचेवर नाचत चालला होता. त्याला छान वाटत असावे. तो गुणगुणत होता. मी त्याला व तो मला शुभ रात्र म्हणालो. मग मी घरी गेलो. पण तो कुणाबरोबर नव्हता. कुणी मुलगी वा मनुष्य. मला वाटते, जर त्याला --- “ तो थांबला व लाज वाटत मिसेस ड्रेटॉनकडे पाहिले.

ती म्हणाली, ‘एड, पुढे बोल.”

एड बोलला, “पुढचे मला काही माहिती नाही.”

जो म्हणाला, “तुम्हाला काय वाटते आहे, ते मला समजते आहे. तुम्हाला असे वाटते आहे, की जर तो मुलीला त्रास देत असेल, तर तुला तो दिसला तेव्हा एकटा दिसला नसता. हे बरोबर जुळत नाही.”

शेव्होरलेट गाडीचा दलाल, जॉन एल्ट्रीगहॅम म्हणाला, “मला मिळालेले --- एकुलते एक पत्र --- मजेचा भाग! मला वाटते तो प्रसंग इथे जवळपास उभ्या केलेल्या गाडीत घडला असावा. पण सर, खरे तर तसे करायची काही संधी नव्हती. कारण दोन पोलीस गस्त घालत गाड्यांमधून काही चोरले जात नाही ना, हे बघत फिरत होते. अजून एक गोष्ट मला जाणून

घ्यायला आवडेल, की या शिक्षकाने माझ्याकडून गाडी विकत घेतली, म्हणून नव्हे, पण ती मुलगी किंचाळली का नाही? गावातील या टोकापासून त्या टोकापर्यंत किंकाळी ऐकू जाते. मी तरुण असतांना मला हे माहिती होते.''

सॅम लोके म्हणाला, ''कदाचित हल्ली मुली किंचाळत नसतील.'' जो सोडून सगळे हसले.

इबेन बोलला, ''हे बरोबर आहे. त्या त्यांचे किंचाळणे काही दिवस खूप विचार केल्यावर ओरडण्यासाठी, राखून ठेवत असतील.''

एड वेल्स बोलला, ''आणि मग निनावी पत्रे लिहित असतील.''

जॉन एल्ट्रीगहॅम म्हणाला, ''ओहो, एखादे वेळेस ती ओरडली नसेल, कारण तिला तो कुणीतरी दुसरा वाटला असेल.''

जो म्हणाला, ''इथे एक स्त्री उपस्थित आहे.''

मिसेस ड्रेटॉन बोलली, ''हे ठीक आहे. जॉनचे बरोबर असू शकेल. ती का किंचाळली नाही?''

जो म्हणाला, ''मला वाटते, तुम्ही याचा विनोद करू नये.''

मिसेस ड्रेटॉन बोलली, ''जो, मी तसे करत नाही आहे. पण जर ती ओरडली असती, तर पोलिसाने किंवा इतर कुणीतरी नक्की ऐकले असते. आणि तो शिक्षक सभागृहात, आपल्याबरोबर मंचावर होता. आणि नंतर काही वेळाने एडने त्याला त्याच्या दुकानासमोर पाहिले. लक्षात घ्या, मी काही त्या माणसाने मुलीला काही केले नसेलच, अशी भलावण करत नाही आहे. पण मला माहिती नाही --- " बऱ्याच वेळाने त्याचा घसा खाखरत, घड्याळजी, मोरटॉन अथेरटॉन बोलला, ''मी माझ्याबरोबर पत्र आणले आहे. मी पैज लावतो, की असे करणारा मी एकटाच आहे.''

जो म्हणाला, “नाही, मोरटॉन, मी पण आणले आहे.”

“आपण बघू तुझे व माझे जुळते का? मी ते वाचतो. “प्रिय सर, मोटारीत मुलीची छेड काढून अतीपसंग करणाऱ्या तुमच्या दारूबाज शिक्षकाला त्या रात्रीनंतर अजून किती दिवस तुम्ही नोकरीत ठेवणार आहात? तो शिक्षकपदाला लागलेला धब्बा आहे. तो शिक्षक म्हणूनदेखील चांगला नाही. सहीः उबग आलेले करदाते. जो, तुझे वाचतोस का?”

जो म्हणाला, “हो. शब्दनशब्द वाचतो.”

इबेनने मिसेस ड्रेटॉनच्या खांद्यावर हात ठेवला. “ल्युसी, आता तू याला हरकत घेणार नाहीस का? मला ते पत्र बायकी वाटते.”

मिसेस ड्रेटॉन म्हणाली, “मला वाटते तुमचे बरोबर आहे.”

“हे गंभीरपणे घ्यायचे असेल, तर मला अजून पुढे झुकले पाहिजे. आपण पुरावा मागितला पाहिजे आणि त्याने कोणत्या मुलीला त्रास दिला, हे शोधून काढले पाहिजे. का आपण हे सर्व विसरून जायचे? जो, यावर मतदान घेतले तर?”

जो ने सभोवताली पाहिले. आणि त्याला समजले की मतदानाने काही मिळणार नाही. तो म्हणाला, “मतदान नको. हे सर्व अनधिकृत आहे. ही काही नेहमीची सभा नाही.”

सॅम लोके उभा राहिला. असे असेल तर मी अनधिकृतपणे, सहज म्हणून घरी जातो. या खुर्चा बसायला फार कडक आहेत.” बाकीचेही उठले.

एड वेल्स बोलला, “बरोबर आहे.”

मोरटॉन अथेरटॉन बोलला, “अं --- अं”

जॉन एल्ट्रीगहॅम म्हणाला, “उगीचच वेळेचा मूर्ख अपव्यय.”

जो ट्रॅव्हर्स म्हणाला, “ठीक आहे. यात कदाचित काही तथ्य असू शकेल.”

इबेन म्हणाला, “ओहो, ल्युसी, आपण आपले सुरक्षित असावे, म्हणून मी तुला घरी सोडतो.”

मिसेस ड्रेटॉन म्हणाली, “आनंदाने.”

# THE IDEAL MAN

# आदर्श मनुष्य



मोठ्या शहरातील हजारो घरांपेक्षा जेन्सनकडील न्याहारी काही वेगळी नव्हती. वॉल्टर जेन्सनने वर्तमानपत्र जेवायच्या टेबलावरील, मीठ, साखर इ. ठेवायच्या संचाला टेकवून ठेवले व अस्खलितपणे वाचले. जेव्हा त्याने कॉफीचा कप ओठांना लावला, तेव्हाही छापील पानांवरून त्याने त्याची नजर जराही वळवली नाही. त्याचा सात ते आठ या वयातील मुलगा पॉल जेन्सेन,

त्याचे गरम सिरीयल खात होता. ते खाण्यासाठी, त्यात त्याला बरीच साखर घालावी लागली. मायरना एल जेन्सेन, वॉल्टरची पाच वर्षांची मुलगी, तिच्या डाव्या हाताने तिचे फिकट सोनेरी केस खाजवत होती, तर उजव्या हाताने खात होती. मायरना फॅशन करण्यात माहीर होती. ती चमचा तोंडात घाले, सिरीयल आत ढकले व चमचा उलटा करून तोंडातून काढे. एल्सी जेन्सेन [ मिसेस वॉल्टर ] क्षणभर खायची थांबली. तिच्या जिभेने दाढेपुढील द्विदल दातावरून जीभ फिरवली. त्याची दखल घेतली जाण्याची गंभीरपणे गरज होती. ही एवढीच गोष्ट तिने मुलांपासून लपवली --- ती केल्यामुळे, तिच्या दातांना काही झाले होते, हे तिला सगळ्यांना कळायला नको होते. प्रत्येकाने तिला सावध केले होते पण तिला हवे होते ते ---

वॉल्टर जेन्सेन ओरडला, “पवित्र नरक! त्याने कॉफीचा कप जोराने खाली आदळला. त्यातील थोडी कॉफी टेबलक्लॉथवर उडाली.

एल्सी म्हणाली, “मुलांसमोर हे कसल्या प्रकारचे संभाषण आहे?”

वॉल्टर म्हणाला, “मुलांसमोर! फार छान! यावर जरा नजर टाक. याकडे बघ.” तो जणू काही तिला भोसकतो आहे, अशा थाटात, त्याने वर्तमानपत्र तिच्यापुढे धरले.

तिने ते घेतले. तिची नजर त्या पानावर फिरुन थांबली. “ओहो, हे होय! ठीक आहे. मला जाणून घ्यायला आवडेल, की त्यात काय चुकीचे आहे? यापुढे तुझे शिव्याशाप व शपथा तुझ्यापाशीच ठेवल्यास, मी तुझे आभार मानेन.”

वॉल्टर म्हणाला, “तू! तू!”

एल्सी म्हणाली, “मायरना, पॉल, चाला शाळेसाठी निघा. तुमचे कोट, टोप्या इकडे आणा. घाई करा.” मुले उठली व हॉलमध्ये गेली. “मुले जिथून

तुला ऐकू शकणार नाहीत, इतकी लांब जाईपर्यंत थांब. मन ताळ्यावर नसल्याने, तुझे वेड्यासारखे बोलणे थांबव.” तिने मायरनाच्या कोटाची बटणे लावली आणि पॉलला त्याच्या कोटाची लावायला लावली व ती तशीच ठेवायला ठासून सांगितले. पॉलचा हात सोडायचा नाही, असे मायरनाला सांगितले. नंतर तिने हसून दोघांना बूट घातले. त्यासाठी चांगल्या गृहिणी संस्थेने तिचे कौतुक केले असते. पण ते इमारतीतून बाहेर पडले नाही तोच ते हास्य संपले. “ठीक आहे. मोठ्या माकडा, चल शिव्याशाप द्यायला लाग. मला त्याची सवय झाली आहे.”

वॉल्टर म्हणाला, “जिमी, ते वर्तमानपत्र परत दे.”

एल्सी बोलली, “तुला ते मिळेल.” तिने ते त्याला दिले. “जा आणि तुला धक्का बसेपर्यंत, ते वाच. तुला स्वतःकडे बघायला हवे.”

वॉल्टर मोठ्याने वाचू लागला. “तुझा नवरा लग्नापूर्वी तुझ्याकडे जेवढे लक्ष देत होता, तेवढे आता देतो का?

उत्तरः मिसेस एल्सी जेन्सेन, पश्चिम, १७ वा रस्ता, गृहिणीः हो, खरे तर जास्तच.

लग्नापूर्वी माझा नवरा अद्भुतरम्य होता, असे म्हणता येणार नाही. तो नक्कीच लाजरा होता. पण लग्न झाल्यापासून, तो अद्भुतरम्यतेच्या दृष्टीने, आदर्श मनुष्य झाला आहे. देवाच्या दयेने, बायकांना गटवण्याची शक्ती असलेले काळे लोक किंवा हॉलीवूडचा प्रसिद्ध नट, क्लार्क गेबल्स त्याच्यापुढे काहीच नाहीत.”

एल्सी म्हणाली, “ठीक आहे, पण म्हणून काय?”

“म्हणून काय? तुला ते विनोदी वगैरे वाटते का? तू वर्तमानपत्रात काय घाणेरड्या गोष्टी टाकते आहेस? अविचारीपणे खासगी गोष्टींचा बाजार मांड.

सगळ्या शेजाऱ्यांना माहिती आहे, की आपल्याला मोटारीचे किती कर्ज आहे. मला वाटते, तू प्रत्येकाला सांग, मी किती कमावतो. एखाद्याची आत्मनिष्ठा / अभिमान सुरक्षित कसा राहील, तुला काय वाटते? वर्तमान पत्राच्या वार्ताहरांभोवती चकरा मारून आणि त्यांना तुमचे थोबाड दाखवून?"

"मी कुठेच गेले नव्हते. त्यानेच मला थांबवले."

"कोणी थांबवले?"

"वार्ताहराने. कोलंबस सर्कलपाशी. मी कोपऱ्याकडून येत होते, तर तो आला आणि सभ्य माणसासारखी त्याची टोपी काढून मला विचारले. तेच तिथे छापून आले आहे."

वॉल्टर ऐकत नव्हता. तो म्हणाला, "कार्यालय. अरे देवा, ते कार्यालयात माझे काय करणार आहेत? मॅकगोनिगल. जेफरिज आणि हॉल. थांब, ते बघतील. त्यांनी बहुधा ते आधीच वाचले असेल. मी आत शिरायचीच ते वाट बघत असतील. मी माझ्या टेबलाशी जाईन. नंतर ते सर्वजण मला बोलावू लागतील. बायकांना गटवण्याची शक्ती असलेले काळे लोक किंवा हॉलीवूडचा प्रसिद्ध नट, क्लार्क गेबल्स." तो तिला निरखू लागला. तुला माहिती आहे का, की काय होणार आहे, की माहिती नाही? ते जास्त आक्रमक होण्यापूर्वी विनोद करायला लागतील. मग बॉसला हे काय चालले आहे, हे जाणून घ्यायचे असेल आणि तो ते शोधून काढेल. कदाचित ते सरळ हिसकावून घेणार नाहीत. पण तो जाणून घेईल. तो मला त्याच्या खोलीत बोलावेल आणि म्हणेल तुला आजपासून इथून काढून टाकले आहे. आणि त्याचे बरोबर असेल. मला काढावेच लागेल. ऐका, जेव्हा तुम्ही पैशांशी संबंधित कार्यालयात काम करत असता, तेव्हा तुम्हाला तुमच्याकडे

काम करणाऱ्यांनी मूर्खासारखी प्रसिद्धी मिळवलेली नको असते. जर लोकांच्या विश्वासाला धक्का लागला तर --- "

"ते तुझ्याबद्दल एकही शब्द बोलत नाहीत. ते एल्सी जेन्सेन बोलते. तुम्ही कुठे काम करता किंवा इतर काही ते बोलत नाहीत. तुम्ही फोनच्या पुस्तकात वॉल्टर जेन्सेनचा कुठलाही नंबर आहे का, ते बघ. त्या नावाचे कितीतरी लोक असतील. "

"तसे तीन नंबर आहेत आणि त्यात क़्वीन्स रस्त्यावर रहाणाऱ्या वॉल्टर जेन्सेनचाही आहे."

"तो वॉल्टर जेन्सेन दुसराही असू शकेल."

"१७४ व्या रस्त्यावर रहाणारा नव्हे. जरी लोकांना माहिती नसले, तरी त्यांना कार्यालयात समजेल. जर त्यांनी प्रसिद्धीची पर्वा केली नाही तर? सगळ्या बॉसेसना हे माहिती करून घ्यायचे असेल, की मला अशी बायको आहे का --- जी अविचाराने बोलत इकडे तिकडे फिरेल. माझ्यावर विश्वास ठेव, त्यांना अशी बायको असलेल्या लोकांनी त्यांच्याकडे काम करायला नको आहे. लोक --- "

"ओहो, तू आणि तुझे लोक."

"हो, मी आणि माझे लोक. त्या वर्तमानपत्राचा खप दोन लाख आहे."

एल्सी म्हणाली, "ओहो, काय मूर्खपणा आहे!" आणि न्याहारीच्या बशा गोळा करू लागली.

"ठीक आहे, काय त्रास आहे, पण मी आज त्या कार्यालयात जाणार नाही आहे. तू त्याना फोन करून सांग, की मला सर्दी झाली आहे."

एल्सी म्हणाली, "तू मोठे बाळ! जर तुला घरी बसायचे असेल, तर तू स्वतः फोन कर."

"मी तुला फोन करायला सांगितला. मी कार्यालयात जाणार नाही."

"तू कार्यालयात जा, नाहीतर मी --- तसेही, तू स्वतःला कोण समजतोस? यावर्षी तू आधीच काही रजा घेतलेल्या आहेस. तुझ्या काकांचा दफनविधी आणि भावाचे लग्न. तुझे चालू दे. एक दिवस रजा घे. आठवडाभर घे. आपण जगभर प्रवास करू. तू नोकरी सोड आणि मी मिस्टर फेटनना माझी पहिली नोकरी परत द्यायला सांगतो. मी तुला पाठींबा देते. अरे माकडा, तू इथे बसलेला असतांना, मी तुला पाठींबा देते." तिने ताटल्या खाली ठेवल्या आणि तिचा ॲप्रन डोळ्यांना लावला. ती खोलीतून बाहेर धावत गेली.

वॉल्टरने सिगरेट काढली व तोंडात ठेवली, पण पेटवली नाही. त्याने ती तोंडातून काढली. टेबलावर ती आपटली, तो उठला आणि खिडकीबाहेर पाहिले. एक पाय दिव्यावर ठेऊन, हनुवटी हातात धरून, अंगणाच्या पलीकडे असलेल्या भिंतीकडे बघत, तो तिथे बराच वेळ उभा राहिला. मग तो परत त्याच्या खुर्चीकडे आला व जमिनीवर पडलेले वर्तमानपत्र उचलून वाचू लागला. पहिल्यांदा त्याने त्याच्या बायकोची मुलाखत परत वाचली. इतर पाच मुलाखती पहिल्यांदाच वाचल्या. पहिली कोलंबस रस्त्यावर रहाणाऱ्या, गृहिणी असणाऱ्या, हसऱ्या मिसेस ब्लूमबर्गची होती. ती म्हणाली, "तिचा नवरा रात्री घरी आला, तेव्हा इतका दमला होता, की अद्भुतरम्यता हा शब्द फक्त शब्दकोशातच राहिला. पूर्व, १२३ वा रस्ता, इथे रहाणारी, गृहिणी असलेली मिसेस पेट्रूसेली म्हणाली, "तिला तिच्या नवऱ्याच्या लग्नापूर्वीच्या व आताच्या लक्ष देण्याच्या पद्धतीत काही फरक जाणवला नाही. पण तिचे लग्न होऊन फक्त पाच आठवडे झाले होते.

तिथे अजून तीनजणी होत्या. एका बाईचा नवरा जास्त लक्ष देत होता. पण तिने त्याची तुलना बायकांना गटवण्याची शक्ती असलेले काळे लोक किंवा हॉलीवूडचा प्रसिद्ध नट, क्लार्क गेबल्स यांच्याशी केली नाही. दुसऱ्या बाईचा नवरा कमी लक्ष देत होता पण ती मिसेस ब्लूमबर्गसारखी विरोधाभास दाखवत चिडली नाही. शेवटची बाई म्हणाली, तिचा नवरा जहाजावर रेडिओ ऑपरेटर होता. तिला फारसे काही सांगायला वाव नव्हता कारण ती त्याला फक्त दर पाच आठवड्यांनी भेटायची.

जेन्सेनने त्यांचे फोटो तपासले. आणि तुम्हाला एल्सीबद्दल एक गोष्ट म्हणावीच लागेल, की सर्वात ती सुंदर होती. त्याने मुलाखती परत एकदा वाचल्या आणि त्याने मनाविरुद्ध कबूल केले की --- ठीक आहे, जर तुम्हाला मुलाखत द्यायची असेल, तर एल्सी सर्वात चांगली होती. मिसेस ब्लूमबर्ग सर्वात वाईट होती. त्याच्या मित्राने जर वर्तमान पत्र पाहिले असते, तर नक्कीच ब्लूमबर्गचा द्वेष केला असता.

त्याने वर्तमानपत्र खाली ठेवले. सिगरेट पेटवली आणि त्याच्या बुटाकडे निरखून बघू लागला. त्याला मिस्टर ब्लूमबर्गसारख्या खरेच दमून भागून, घरी येणाऱ्या माणसाबद्दल कणव वाटू लागली. जेव्हा कार्यालयातील सगळे त्याच्यावरुन विनोद करू लागतील व टोमणे मारतील, तेव्हा काय करायचे, हा विचार त्याने शेवटी केला. त्याला त्याबद्दल छान वाटू लागले.

त्याने कोट व टोपी घातली. मग झोपायच्या खोलीत गेला. तिथे उशीत तोंड खुपसून, एल्सी हुंदके देत, पडलेली होती.

तो म्हणाला, “मला वाटते, मी आता कार्यालयात जावे.” ती हुंदके द्यायची थांबली.

तिने त्याला तिचा चेहरा दिसणार नाही अशी काळजी घेत, विचारले, “काय?”

तो बोलला, “मी कार्यालयात चाललो आहे.”

“जर त्यांनी तुला चिडवायला सुरवात केली तर?”

तो म्हणाला, “केली तर केली. त्यात काय मोठे?”

ती बसली. “तू अजून माझ्यावर चिडलेला आहेस का?”

“छे, काहीतरीच काय?

ती हसली व उठली. त्याच्या कंबरेभोवती हात टाकून हॉलमधून चालत गेली. हॉल काही फार रुंद नव्हता. पण तिने तिचे हात त्याच्याभोवती कवटाळलेले ठेवले. ते दारापर्यंत चालत गेले. त्याने दार उघडले व टोपी डोक्यावर ठेवली. तिने त्याच्या गालांचे व ओठांचे चुंबन घेतले. त्याने टोपी नीट बसवली. “ठीक आहे, रात्री भेटू.” ही पहिली गोष्ट त्याच्या डोक्यात आली, की  तो गेल्या कैक वर्षात असे बोलला नव्हता.

## DO YOU LIKE IT HERE?

# तुला इथे आवडले का?



s

दार उघडे होते. अभ्यास करतांना दार उघडे ठेवावे लागे. त्यामुळे कोणी त्यावर टकटक करू शकत नसे. तो ओळखत असलेला व द्वेष करत असलेला आवाज आला, तेव्हा रॉबर्ट चमकला. “अरे रॉबर्ट, व्हॅन नेसच्या कार्यालयात तुला बोलावले आहे.” तो आवाज हग्जचा होता.

रॉबर्टने विचारले, “कशासाठी?”

हग्ज म्हणाला, “अरे झोपाळू मुला, तूच जाऊन का बघत नाहीस?”

रॉबर्ट म्हणाला, “तुझा धिक्कार असो.”

हग्ज म्हणाला, “तुझा धिक्कार असो.” आणि निघून गेला.

रॉबर्ट बाकावरून उठला. त्याने गॉगल काढला. टाय व कोट घातला. त्याने दिवा चालूच ठेवला.

तळमजल्यावर असलेल्या व्हॅन नेसच्या कार्यालयात जाताना रॉबर्टला आश्चर्य वाटत होते, की त्याने काय केले आहे. अनेक शाळांमध्ये जाऊन, त्याला या दोन गोष्टीतील फरक समजला होता, की तुम्हाला 'अमुक तमुकच्या कार्यालयात बोलावले आहे' आणि 'कुणालातरी तुम्हाला भेटायचे आहे' जर शिक्षकाला काही क्षुलक गोष्टीसाठी तुम्हाला बोलवायचे असेल, तर तुम्हाला प्रत्येक वेळी त्याच्या कार्यालयात जावे लागत नाही. पण जर ते गंभीर असेल, तर ते नेहमी म्हणतात, 'तुम्हाला अमुक तमुकच्या कार्यालयात बोलावले आहे' म्हणजे कुणीतरी तुमची वाट बघत कार्यालयात थांबले आहे. तुमच्यासाठी खास थांबले आहे. असा फरक का असावा, हे रॉबर्टला माहिती नव्हते. पण ठीक होते. शेवटी त्याने असा विचार केला की, तो शॉवर घ्यायच्या ठिकाणी सिगरेट ओढत होता. पण व्हॅन नेसने त्याकडे कधीच एवढे लक्ष दिले नव्हते. तिथे प्रत्येकजणच सिगरेट ओढायचा. आणि व्हॅन नेसने कधीच काही केले नाही. पण आता त्याला बहुधा रॉबर्टला पकडायचे असावे.

अभ्यासाच्या वेळी जेव्हा व्हॅन नेस चक्कर मारे, तेव्हा तो प्रत्यक्ष बोले. तो प्रत्येक खोलीत बघत, गॅलरीतून सावकाश चालत जाई. तेव्हा तो हे बघे की त्या त्या खोलीत तिथे रहाणणाराच आहे, आणि दुसरा कुणी नाही ना. व्हॅन नेसला, फारसे गंभीर नाही पण काही नको ते आढळे, तेव्हा तो त्याच्या हातात असलेली यादी घेऊन दाराशी थांबे व त्या मुलाला बाहेर बोलावून, त्यासाठी काय शिक्षा आहे, हे ओरडून सांगे. त्यामुळे कार्यालयात बोलावले जाणे, याला थोडा भीतीचा वास येत होता.

रॉबर्टने व्हॅन नेसच्या अर्धवट उघड्या दारावर टकटक केली. “आत या.”

व्हॅन नेस चाकांच्या खुर्चीत बसून, एका मोठ्या बाकाशेजारी असलेल्या लहानशा बाकावर ठेवलेल्या टाईपरायटरवर काम करत होता. रॉबर्टला पाहिल्यावर तो वळला व मोठ्या बाकड्यामागे जाऊन, एखाद्या जज्जने शिक्षा सुनवावी तशा थाटात, तोंडात पाइप ठेऊन रॉबर्टकडे बघू लागला. रॉबर्ट बोलला, “हग्ज म्हणाला, तुम्ही मला भेटायला बोलावले आहे.” ”हो.”त्याने तोंडातील पाइप काढला आणि सावकाशीने पाइप रिकामा करायला सुरवात केली. खूप वेळ तो ते करत राहिला. “हो, मी बोलावले.” त्याने पाइप रिकामा करणे संपवले. रॉबर्टच्या खूप वर्षांच्या अनुभवावरून, ते काहीसे त्रासदायक प्रकरण असल्याचे त्याने ताडले. ते नेहमी तुम्हाला थांबवून घाबरवायचा प्रयत्न करतात. हे पोलिसांच्या थर्ड डीग्री सारखे असते. तुम्हाला त्याची सवय असली, तरी तुम्ही थोडे तरी घाबरता.

व्हॅन नेस त्याच्या खुर्चीत मागे रेलला आणि चष्म्यातून, रॉबर्टकडे रोखून पाहू लागला. त्याने घसा खाखरला. तो म्हणाला, “तू बसू शकतोस.”

रॉबर्ट म्हणाला, “हो, सर.” तो बसला आणि परत व्हॅन नेसने त्याला थांबायला लावले.

“रॉबर्ट, तू आता इथे किती काळ आहेस? पाच आठवडे?”

“थोडे जास्त. सहा आठवडे.”

व्हॅन नेस म्हणाला, “सहा आठवडे? सात जानेवारीपासून, सहा आठवडे. विचित्र. विचित्र. सहा आठवडे, आणि मला तुझ्याबद्दल एक गोष्ट खरेच माहिती नाही. काही झाले तरी, पाहिजे तेवढी नाही. रॉबर्ट, मला तुझ्याबद्दल थोडे सांग.”

“म्हणजे काय सांगू?”

“काय सांगू? म्हणजे तू इथे येण्यापूर्वीच्या तुझ्या आयुष्याविषयी सांग. तू कुठून आलास, तू तोपर्यंत काय काय केलेस, तू इतक्या अनेक शाळांमध्ये तू का गेलास, आणि असेच.”

“खरे तर मलाही माहिती नाही.”

“ओहो, रॉबर्ट, आता तुझी स्वतःबद्दलची माहिती सांगायला तुझा अंगभूत नम्रपणा आड येऊ देऊ नकोस. दार लाव.”

रॉबर्टने उठून दार लावले.

व्हॅन नेस म्हणाला, “छान, आता सांग. तुझ्या आयुष्यात काय काय घडले, ते सांग. रॉबर्ट हम्फ्रे, दुसऱ्या क्रमांकाचा अर्ज, मॅकॲलीएस्टर मेमोरियल हॉल इत्यादी.”

रॉबर्ट हम्फ्रे बसला. टायची गाठ घट्ट केली. “खरे तर मला माहिती नाही. मी न्यूयॉर्कला वेस्ट पॉईट इथे जन्मलो. माझे वडील तेव्हा पहिले लेफ्टनंट होते आणि आता मेजर आहेत. माझे आईवडील आणि मी अनेक जागी राहिलो. कारण ते सैन्यात होते आणि त्यांच्या बदल्या होत असत. हेच तुम्हाला हवे होते का?”

त्याचे थांबणे व्हॅन नेसला विनोदी वाटल्याचे दिसले. “पुढे चालू ठेव. केव्हा थांबायचे --- हे --- मी तुला सांगेन.”

मी दहा वर्षांचा होईपर्यंत नेहमीच्या शाळेत गेलो नाही. माझ्या आई वडीलांचा घटस्फोट झाला आणि मग मी सॅनफ्रॅन्सिस्कोच्या शाळेत गेलो. तिथे मी फक्त एक वर्ष राहिलो. कारण माझ्या आईने पुनर्विवाह केला आणि आम्ही इलिनिऑस, शिकॅगो इथे गेलो.”

“शिकॅगो इलिनिऑस! ठीक आहे. रॉबर्ट, यात थोडा भूगोलही आला, नाही का? पुढे सांग.”

“तिथे आम्ही साधारण दोन वर्षे राहिलो. मग पूर्वेला गेलो. माझे सावत्र वडील मान्यताप्राप्त हिशेबनीस होते. आम्ही खूप ठिकाणी फिरलो.”

“रॉबर्ट, तुम्ही भटके झालात, नाही का?”

“असे मला वाटते. म्हणजे नक्की काय, ते मला माहिती नाही.” रॉबर्ट थांबला.

“पुढे सांग. चालू ठेव.”

“त्यामुळे मी अनेक शाळांमध्ये गेलो. काही दिवसशाळा काही रहायच्या शाळा. हे सर्व माझ्या येथील अर्जात लिहिलेले आहे. माझ्या येथील शिक्षणासाठी हे सर्व मला लिहावे लागले.”

“बरोबर. ही मोठी महत्वाची यादी आहे, रॉबर्ट. फार महत्वाची. तुझ्यासारखे मला फिरता आले असते तर! स्विझर्लंडमधील शाळेत मला जायला मिळाले नाही, ही माझी एक खंत आहे. तेथील शाळा तुला आवडली का?”

“मी तिथे फक्त तीन महिने होतो. मला वाटते, मला ती आवडली.”

“रॉबर्ट, तुला इथे आवडते का?”

“नक्कीच.”

“नक्की? नक्की आवडते का? तुला काही बदल नको आहे?”

“नाही, मी असे काही म्हणणार नाही. कुठल्याच शाळेविषयी नाही.”

व्हॅन नेस म्हणाला, “खरच. तुझ्या खूप अनुभवावरून, तुला शैक्षणिक बाबतीतला अधिकार असावा. कमकुवतपणा, कुशलता किंवा ताकद याबद्दल आधुनिक शैक्षणिक पद्धतीत, तुझ्या मते खूप थिअरीज असतील.”

“मला माहिती नाही. मी फक्त --- मला माहिती नाही. काही शाळा इतर शाळांपेक्षा चांगल्या असतात. निदान मला तरी काही शाळा जास्त आवडतात.”

व्हॅन नेस कसला तरी विचार करत असावा. “अर्थात. अर्थात.”

तो खुर्चीत मागे रेलून बसला व छताकडे बघू लागला. त्याने त्याचे हात पँटच्या खिशावर ठेवले आणि अचानक पुढे वाकला. खुर्ची खाली आली आणि त्याचे पोट बाकावर दाबले गेले. त्याचा हात मुठी वळून, पूर्णपणे बाकावर पसरला गेला.

“रॉबर्टने खाली घड्याळाकडे पाहिले. व्हॅन नेसचा आवाज कडक झाला. त्याने मूठ उघडली. त्यात घड्याळ होते. “रॉबर्ट, तू पूर्वी हे कधी पाहिले होतेस? उत्तर दे.” रॉबर्टने खाली त्या घड्याळाकडे पाहिले. तो म्हणाला, “नाही. मला नाही असे वाटत. तो हे खरेच बोलू शकला, म्हणून त्याला आनंद झाला.

व्हॅन नेसने त्याचा हाताच्या मुठीत घड्याळ होते तसेच ठेवले. त्याने बराच वेळ, निदान पंधरा सेकंद त्याचा हातदेखील काही न बोलता, तसाच ठेवला. नंतर त्याने मूठ उघडून घड्याळ बाकावर पडू दिले. तो परत खुर्चीवर आधीसारखा बसला. पाइप उचलला. सावकाश तो भरला व पेटवला. जाळ विझल्यावर खूप वेळ त्याने काडी मागे पुढे केली. खुर्ची थोडी फिरवली. त्याने रॉबर्टपासून लांब भिंतीकडे बघितले. “एक मुलगा म्हणून मी सहा वर्षे या शाळेत काढली. माझे दोन भाऊ याच शाळेत शिकले. माझे वडीलही याच

शाळेत शिकले. मला या शाळेबद्दल खोलवर,  असीम प्रेम आहे. एका दशकापेक्षा जास्त काळ, मी या शाळेत शिकवतो आहे. मी या शाळेचा एक भाग आहे, असा विचार करायला मला आवडते. तिच्या प्रगतीला मी निदान काही प्रमाणात हातभार लावला आहे. उच्च शिक्षणाची एक पायरी, यापेक्षा मी तिला जास्त महत्व देतो. माझ्या वर्गबंधूंची मुले आता इथे शिकतात. मला इतरत्र कॉलेजात, विद्यापीठात नोकरी मिळू शकली असती, पण मी इथे रहाणे पसंत केले. का? का? कारण माझे या जागेवर प्रेम आहे. रॉबर्ट, माझे या जागेवर प्रेम आहे. मी तिच्या परंपरा सांभाळल्या. तिचे नाव राखले.” तो थांबून रॉबर्टकडे वळला. “रॉबर्ट, इथे चोरासाठी जागा नाही.”

रॉबर्ट काही बोलला नाही.

“इथे चोरासाठी जागा नाही, असे मी म्हणालो.”

“हो, सर.”

घड्याळाकडे न बघता व्हॅन नेसने ते उचलले. त्याने ते बाकापासून काही अंतरावर धरले. “हे चमत्कारिक घड्याळ गेल्या शुक्रवारी दुपारी खात्रीने बास्केटबॉलच्या खेळामधून चोरले गेले. माझ्याकडे चोरीची तक्रार आल्याबरोबर, मी लगेच त्यासाठी शोधाशोध सुरु केली. पण माझा शोध अयशस्वी ठरला. कुठल्या तरी सोमवारी दुपारी हे घड्याळ इथे ठेवले गेले. का? कारण त्या धक्कादायक नालायक चोराला माहिती होते, मी मोठी शोधमोहीम चालवली आहे आणि त्या नालायकाला उपरती झाल्याने, त्याने घड्याळ परत केले. तो कुणीही असो, पण त्याने सर्वांना उबग येईल अशा संशयात टाकले. मी तुला सांगतो, मला माहिती नाही चोर कोण आहे व कोणी मला ते परत केले. पण रॉबर्ट, देवकृपेने मी माझा शोध चालू ठेवणार आहे.

एवढेच मला सांगायचे होते. तू जाऊ शकतोस.” व्हॅन नेस जवळजवळ धापा टाकत, परत खाली बसला.

रॉबर्ट उभा राहिला. “मी तुम्हाला वचन देतो, मी --- “

व्हॅन नेस बोलला, “मी तुला सांगितले, तू जाऊ शकतोस.”

रॉबर्टला कळेना, की त्याच्यामागे दार लावावे की उघडे ठेवावे. पण त्याने काही न विचारता, ते उघडे ठेवले. तो जिना चढून, त्याच्या खोलीत गेला. आत जाऊन कोट व टाय काढला आणि पलंगावर बसला. पहिल्यांदा संतप्त होऊन आणि नंतर कमकुवतपणे तो म्हणाला, “हलकट, घाणेरडा हलकट.”

# NO MISTAKES

# चुका नाहीत



चर्चमध्ये गर्दी होती आणि त्यांना उशीर झाला होता. मॅकडोनाल्डने कुणाला नाही, तर स्वतःला दोष दिला. सुरवातीला, तो जास्त झोपला आणि त्यासाठी तो जीनला दोष देऊ शकत नव्हता. गेल्या तीन महिन्यांपासून त्यांना वेळेवर उठवायची जबाबदारी त्याने घेतली होती आणि आजच्या दिवसापर्यंत

तो ती उत्तम रीत्या निभावत होता. शेवटी ती सर्वात पहिल्यांदा उठली. आणि तिला त्याला उठवावे लागले. ती म्हणाली होती, "चल आटप, उठ. ही तुझी मेजवानी आहे, आठव. मग तिथे स्वच्छ कडक कॉलर्स नव्हत्या. ओहो, तिथे कॉलरच्या पेटीत, उपयोग नसलेल्या, चुरगळलेल्या पण स्वच्छ कॉलर्स खूप होत्या. पण या प्रसंगी घालता येतील अशा नव्हत्या. हा गडद निळा सूट व स्वच्छ कडक कॉलर घालायचा प्रसंग होता. त्यामुळे त्याला लॉन्ड्रीत जाऊन त्यातल्या त्यात चांगली कॉलर निवडावी लागली --- जी त्याने तीन रात्रींपूर्वी जेवणाच्या जाकीटावर घातली होती. ती फारशी स्वच्छ नव्हती. पण तिथे असलेल्या सर्वात बरी होती. मग टॅक्सीचालकाने कधी शेक्सपिअर रस्त्याचे नाव ऐकले नव्हते. तो ब्रुकलीनचा टॅक्सीचालक होता आणि मॅकडोनाल्डला तिथे नेमके कसे पोचायचे, याची फारशी खात्री नव्हती. शेवटी, ते तिथे पोचले. चर्च ओसंडून वहात होते. प्रार्थना सुरु झाली होती. त्याना ओळीच्या कडेला गुडघे टेकून बसावे लागले.

मॅकडोनाल्ड उठला आणि जागा दाखवणाऱ्याकडे गेला. "ऐक. मला आमंत्रण आहे ---

तो मनुष्य बोलला, "त्याला माझा काही इलाज नाही." त्याने एका पाटीकडे निर्देश करत म्ह्टले, "कृपया पवित्र प्रार्थनेपूर्वी पंधरा मिनिटे तुमच्या बाकावर बसा."

"मला माहिती आहे. पण आम्ही फार लांबून एकोणीसाव्या रस्त्यापासून आलो आहोत आणि माझी बायको कडक जमिनीवर गुडघे टेकून बसू शकत नाही."

"शू – उ. इतर लोक गुडघ्यात वाकले आहेत."

"पण ती गर्भारशी आहे. तिने वाकायलाच नको. तसेही ती प्रोटेस्टंट आहे."

त्यामुळे फरक पडला. "ठीक आहे., कुणी जागा सोडायला तयार असेल तर, मी बघतो. पण तुम्हाला दोघांना एकत्र जागा मिळणार नाही."

मॅकडोनाल्ड म्हणाला, "ते ठीक आहे. फक्त तिला वाकायला लागता कामा नये. आभारी आहे."

"मी बघतो, मला काय करता येईल." तो बाकांच्या रांगांमधून एका बाजूकडून सावकाश चालत गेला व दुसरीकडून परतला. मध्यावर तो थांबला व तेथील पहिल्या जागी बसलेल्या माणसावर वाकला. त्याला तो मनुष्य माहिती होता, कारण तो हसला व तो मनुष्यदेखील हसला व जोराने मान हलवली. मग मॅकडोनाल्डला सांगण्यात आले, की जीनसाठी जागा मिळाली आहे.

मॅकडोनाल्ड जीनला म्हणाला, "तू पुढे हो."

"पण -- कधी उठायचे आणि प्रत्येक गोष्ट मला माहिती नाही."

तो म्हणाला, "इतरांकडे लक्ष ठेव. पण बस तर खरी. मी इथेच असेन. चल."

त्या माणसाबरोबर ती गेली. एका हातात टोपी धरून व दुसऱ्या हातात जपमाळ घेऊन, त्याचा मित्र उठला आणि जीन तिथे आत शिरली. तो मनुष्य तिच्या पाठोपाठ जाऊ लागला. वाट अरुंद होती. मॅकडोनाल्डने पाहिले, की तिच्या डावीकडील कडक चेहऱ्याच्या आयरिश बायका तिच्याकडे टकमक बघत होत्या. तिला बसवून देणारा माणूस परत आला आणि मॅक डोनाल्डने त्याचे परत आभार मानले. शेवटी तो ओ'कोनोर [आयरिश आडनाव] कडे लक्ष देऊ शकला.

जरी ओ'कोनोरची ती पहिलीच प्रार्थना असली, तरी साहजिकच तो त्याच्याकडून सगळे काही नियमाप्रमाणे करण्याची अपेक्षा करत होता. जरी मॅकडोनाल्डची तशी अपेक्षा असली तरी, ओकीने चुका न केलेल्या बघून, त्याला बरे वाटले. मॅकडोनाल्डने स्वतःला सांगितले, इतके वर्षांनी तो कदाचित प्रार्थना मनापासून करत नव्हता. धर्मगुरूला मदत करणारा मुलगा असतांना, त्याने निदान शंभर वेळा तरी ते काम केले होते. आताही त्याला त्यातील जवळजवळ सर्व लॅटीन ओळी आठवत होत्या. जरी लहान केलेली असली तरी, रोमन कॅथॉलिक चर्चसाठी तयार केलेली पापांची कबुली देणारी विशेष लॅटीन प्रार्थनाही त्यात होती. काही कारणाने ती म्हणायला थोडी अवघड होती. त्यातील पहिल्या अर्ध्या ओळीतील शब्द लक्षात ठेवणे जरुरीचे होते --- "मी क्युल्पा, मी क्युल्पा, मी मॅक्झीमा क्युल्पा" आणि मग तुम्ही "आयडीओ प्रीकोर" मध्ये जाता. आणि पहिल्या अर्ध्याचा शेवट बदलता. असेच काहीसे. एकदा तुम्ही ते शिकलात की पोहणे किंवा सायकल चालवणे जसे आपण विसरत नाही, तसेच ते कधीही विसरायला होत नाही. ओकी अजून ते गेली दहा वर्षे रोज शिकत असला, तरी तो काळजीने चुकत नव्हता, हे बघणे चांगले होते. जुना धर्मगुरूने डालमॅटीक [क्रोशियाचा एक भाग] अंगरखा घातला होता. तो बहुधा चर्चचा अध्यात्मिक गुरु होता. ओकीचा वर्गबंधु असलेला तरुण मनुष्य, त्याच्या हाताखालचा होता.

ओकीच्या सर्व नव्या मित्रांना त्याने आमंत्रण पाठवले होते. तरीही त्याला आमंत्रण पाठवायला तो विसरला नव्हता. मॅक डोनाल्डला आश्चर्य वाटले, की ओकीला त्याच्याविषयी कितपत कमीजास्त माहिती होते. त्याने ओकीला पाच वर्षांपेक्षा जास्त काळ लिहिले नव्हते. आठ वर्षे असेल. आणि ओकीने चर्चमध्ये प्रवेश केल्यापासून त्याने ओकीला पाहिले नव्हते. तरीही

ओकीने शोधून काढले असणार, की मॅकडोनाल्डने चर्चबाहेर लग्न केले आहे आणि तो न्यूयॉर्कला रहातो.

मॅकडोनाल्डच्या घरी आमंत्रण पाठवले गेले आणि इतर सर्व पत्रांप्रमाणे ते कार्यालयाला कळवले गेले.

त्याने ओकीचा टिपेला चढलेला मृदू आवाज “ग्लो --- री --- या डी --- इ --- ओ” ऐकला. त्याने ओकीला वेदीवरून खाली उतरतांना पाहिले. त्याचे कपडे त्याला बरोबर बसत नव्हते. ते काय होते? --- त्याच्या मानेभोवतालचे पांढरे फडके रुमालासारखे दिसत होते. ते ओकीच्या चेहऱ्यापेक्षा अधिक पांढरे नव्हते. बिनहाताचा गाउन त्याच्यासाठी फार मोठा होता. आणि पायापर्यंतचे कापड त्याच्या पायात मध्ये येत होते. त्याचा पाय त्यात अडकत होता. हार्वर्ड व बोस्टन कॉलेजच्या कोलगेट विरुद्धचा शक्तिशाली खंदा तरुण असलेल्या ओकीला मदत करतांना, मुख्य धर्मगुरू विचित्र दिसत होता. मॅकडोनाल्डला आश्चर्य वाटले, की जीन या सगळ्याचा विचार करत होती. ती काय विचार करते आहे, ते त्याला माहिती असल्याची त्याला भीती वाटत होती. चर्चमध्ये टाय आणि सूट घातलेला मनुष्य उठला व नंतर धार्मिक उपदेश आणि गाणी इंग्लिशमधून म्हटली गेली --- हो, त्याला भीती होती, की जीन काय विचार करत असेल.

प्रार्थना अगदी शांतपणे चालू राहिली. मध्ये घंटाही वाजल्या नाहीत. मॅकडोनाल्डने त्याचे डोके लववले, पण डोळे नाही.

त्याला जीनवर नजर ठेवायची होती. त्याला तिच्याबरोबर रहायचे होते. तिच्या हाताला स्पर्श करायचा होता. ती वळून हसली. तोही तिच्याकडे बघून हसला.

नंतर खूप वेळाने प्रार्थना संपल्यावर, लोक जाऊ लागले. जीन उठून त्याच्याकडे आली. तिने त्याचा दंड धरला. चर्चमधून बाहेर पडेपर्यंत, ते काही बोलले नाहीत. त्याने जे केले त्यामुळे त्याला आनंद वाटल्यावाचून राहिला नाही. पण त्याने ते बोलून दाखवायची गरज नव्हती. “आपल्याला कोपऱ्यावर टॅक्सी मिळेल. आपण ओकीच्या घरी जाऊ. तिथे फार वेळ घालवायला नको. पण मला तुला त्याला भेटवायचे आहे.”

“ठीक आहे. जेव्हा सगळे शांत झाले आणि ओ’कोनोरने  थोडेसे पुढे झुकून वेदीचे चुंबन घेतले, ते काय होते? फक्त त्यानेच तसे केले नाही.”

“जेव्हा घंटा वाजल्या, तेव्हा?”

“हो.”

तीन वेळा घंटा वाजल्या. आणि नंतर मिनिटाभराने, परत तीनदा वाजल्या का?”

“हो.”

“ती पवित्र चर्चची खूण होती. मला तो भाग आवडला. मला गाण्याचा काही भाग आवडला पण मला लॅटीन समजत असते, तर बरे झाले असते.”

तो हसला. “तेथील किती लोकांना लॅटीन समजत असेल, असे तुला वाटते?”

ती बोलली, “मला नवल वाटले. तिथे लॅटीन तर सोडा, पण इंग्लिश समजणारे तसे अगदीच थोडे लोक असतील. माझ्या शेजारी एक भयंकर बाई बसली होती. फक्त काही वेळ सोडून, प्रार्थनाभर ती मला ढकलत होती.”

टॅक्सीत त्याने तिचा हात धरला. ओकीचे घर फार लांब नव्हते. बहुतेक या प्रसंगासाठी भाड्याने आणलेल्या स्वयंपाक्याने दार उघडले. एका भल्या मोठ्या, करड्या केसांच्या, कोट व जाकीट घातलेल्या माणसाने माणसाने त्यांचे स्वागत केले. तो म्हणाला ‘‘मिस्टर आणि मिसेस मॅकडोनाल्ड, मी गेराल्ड्चे वडील, डॉ ओ’कोनार आहे आणि ही त्याची आई आहे. तू त्याच्या  कॉलेजमधील खोलीत रहात होतास ना? मॅकडोनाल्डची खात्री होती, की त्याने जीनकडे व्यावसायिकपणे पाहिले. ठीक आहे. गेराल्ड आता येईलच. मध्यंतरीच्या काळात, थोड्या शॅंपेनने कुणाला काही त्रास होणार नाही. मग त्यांनी ती घेतली. एक चांगल्या कपड्यातील तिशीच्या मुलीने ती ओकीची बहीण असल्याचे सांगितले. इतर मंडळींचीदेखील ओळख करून दिली. वडील म्हणाले, ‘‘गेराल्ड नक्कीच एक चांगला धर्मगुरू होईल, आणि तुला त्याचा अभिमान वाटेल.’’ कोट व जाकीटातील अजून साधारण पस्तिशीचा एक वकील माणूस ओकीचा भाऊ व सल्लागार होता. ‘‘मला वाटते, मी तुला पक्ष्यांच्या क्लबमुळे ओळखतो.’’ तो ओ’कोनोर म्हणाला. तिथे ‘स्पर्श करू नका, चव बघू नका व हाताळूही नका.’ या बायबलमधील सुप्रसिद्ध वचनावर विश्वास असणाऱ्या व त्याचे तंतोतंत पालन करणाऱ्या वयस्क बायकाही होत्या. मॅकडोनाल्ड बोलला, ‘‘मी अशी आशा करतो, की एका मिनिटात तो इथे येईलच. आपण इथे बसू या.’’

त्याने जीनला एका खुर्चीकडे नेले. प्रत्येकजण नम्रपणे दुसऱ्याला बसण्यासाठी खुर्ची रिकामी ठेवायच्या प्रयत्नात होता. मग काही मिनिटांनी, ओकी आला. त्याची रोमन कॉलर चमकत होती.

जीन म्हणाली, ‘‘तो स्पेन्सर ट्रेसीसारखा दिसतो आहे.’’

तिचा नवरा म्हणाला, ‘‘तू मूर्ख आहेस.’’

“ठीक आहे. मला तो तसा वाटतो. अर्थक्वेक सिनेमातल्यासारखा.”

“अर्थक्वेक नव्हे, सॅनफ्रँन्सिस्को. पण तू मूर्ख आहेस. मी जितका स्पेन्सर ट्रेसीसारखा दिसतो, तेवढाच तो दिसतो.”

“उठून काही फायदा नाही. ओकीला खूप आशीर्वाद द्यायचे आहेत. एखाददोन वयस्क बायका, तरुण बायका, पुरुष आणि मुले वाट बघत होती की कधी ओकी धर्मगुरूची अंगठी बोटात घालून, त्यांचे हात चुंबेल. त्या सगळ्यांनी वडील ओ’कोनोरला आशीर्वाद देण्यासंबंधी विचारले. मॅक डोनाल्डला वडील ओ’कोनोरचे ओठ असे म्हणत असतांना जाणवले, की “आनंदी असा.” सगळे त्यांच्या पाया पडले. ओकी घाईने आशीर्वादपर पुटपुटला आणि मॅकडोनाल्ड दिसेपर्यंत पुढे चालत राहिला. त्याच क्षणी कुणी त्याचे आशीर्वाद मागत होते. पण तो लगेच मॅकडोनाल्डकडे आला.

“मॅक, अरे जुन्या मित्रा, तू कसा आहेस? तू चर्चमधील प्रार्थनेला होतास का?”

“नक्कीच होतो. ओकी. मला तुला माझ्या बायकोला भेटवायचे आहे. जीन, हा धर्मगुरू ओ’कोनोर आहे.”

“जीन, तू कशी आहेस?”

“फादर, तुम्ही कसे आहात?

“मॅक, हे सगळे केव्हा झाले? आणि मला आमंत्रण कसे मिळाले नाही?”

“कुणालाच आमंत्रण नव्हते. आम्ही --- अं --- “

ओकी म्हणाला, “वॉटरबरीची मुलगी दिसते आहे?”

“नाही, न्यूयॉर्कची.”

फादर ओ’कोनोर म्हणाला, “--- तू कधी लग्न केले म्हणालास?”

मॅकडोनाल्ड म्हणाला, “साधारण सहा महिन्यांपूर्वी.”

जीनकडे बघत फादर ओ’कोनोर म्हणाला, “तू थांबायला पाहिजे होतेस. मी तुझे लग्न लावले असते, नाही का?”

मॅकडोनाल्ड म्हणाला, “नाही, ओकी, मला वाटते, तू लावू शकला नसतास.”

धर्मगुरू म्हणाला, “अस्स, पण तुम्ही दोघे आलात, ते बरे झाले. थोडी शँपेन घ्या.”

एका बाईने त्याच्या शर्टाची बाही खेचली, “फादर, मी तुमचे आशीर्वाद मागू शकते का? मला तुम्ही आठवता, जेव्हापासून तुम्ही --- “

ओ’कोनोर म्हणाला, “आनंदाने.” तो मॅकडोनाल्ड्सकडे बघून बोलला, “माफ करा.”

मॅकडोनाल्ड त्याच्या बायकोशेजारी बसला होता. त्यांनी ओकीला खोलीच्या दुसऱ्या टोकाकडे जातांना पाहिले. जेव्हा तो लांबच्या कोपऱ्याशी गेला, तेव्हा जीन बोलली, “जाऊ या?”

“हो, मला असे वाटते.”

## NOW WE KNOW

# आता आम्हाला माहिती झाले



बऱ्यापैकी मोठ्या सिनेमाशी संबंधित व्यवस्थापकीय कार्यालयात मेरी स्पेलासी काम करत असे. तेथील नियम फार कडक नव्हते. तिथे मेरीच्या आधी कुणीच येत नसे आणि मेरी तिथे साडेदहा पूर्वी कधीच जात नसे. अर्थात संचालकाकडे किल्ली असे. त्याला मेरीने कार्यालय उघडण्यापूर्वी तिथे जायचे असेल, तर तो त्याला कोणी रोकू शकत नसे. तिथे काम करणारे

कायम स्वरूपी लोक कमीच होते. संचालक, छापखान्याचा दलाल, पुस्तके राखणारी, संचालकाची सचिव आणि स्वतःला स्वागतिका म्हणवणारी व तशी खरेच असलेली, मेरी. टंकलेखनाचे, लहानसा स्विच बोर्ड चालवण्याचे व बाकी तिला जे करावेसे वाटेल, ते काम तिचे असे. तिला तिच्या कामाबद्दल खूप गोष्टी आवडत. तिचा पगार चांगला होता आणि संचालक उदार होता. संचालकाचे भाग्य उजळे किंवा तो प्यायलेला असे, तेव्हा तिला अनपेक्षितपणे बोनस मिळे. मेरीला खूप चमकते तारे बघायला मिळत व त्यांचे संचालकाशी कसे संबंध आहेत, हे देखील बघायला मिळे. ती संचालकाबरोबर सर्व सिनेमाच्या पहिल्या खेळाला जात असे. इतर कार्यालयातील मुलीही तिथे आलेल्या असत. इतर संचालकांच्या सिनेमांच्या पहिल्या खेळाला तिला कधीकधी जायला मिळे. संचालक तिला कधीच त्रास देत नसे. छापखान्याचा दलालाने तीन वर्षात तिला कधी लैंगिक गोष्टींवरून छेडले नव्हते. सर्वात छान व नक्कीच कमी आकर्षक नसलेले कामाचे स्वरूप म्हणजे नक्की असलेली कार्यालयात यायची वेळ. खरे तर तिची वेळ दहाची होती. पण गेल्या साडेतीन वर्षात, तिने ती पुढे नेत नेत अकराजवळ आणली होती. त्याबद्दल तिला पुस्तके राखणारीकडून काही परिणाम न होणारे चिमटे बसत. पण संचालकाशी मेरीचे चांगले जमते आहे, हे पाहिल्यावर ते बंद झाले.

मेरी काही आळशी मुलगी नव्हती. पण तिला चांगला वेळ घालवायला आवडे. जेव्हा तुम्ही टाईम्स स्क़्वेअरपासून टॅक्सीने चार डॉलर अंतरावर रहाता आणि तुम्हाला भरपूर डेट्स असल्याने तुमची झोप पुरी होत नसेल, तर मग काय! मेरीला तिचे आठ तास आवडत असत.

कारण ती क्विन्सपासून व बसच्या रस्त्याच्या शेवटाला रहात असे. बहुधा तिला सबवेकडे घेऊन जाणाऱ्या बसमधील मेरी पहिली उतारू असे.

अनेक वर्षे जात येत असल्यामुळे, तिला नुसते पाहून कळे. बसच्या चालकांशी तिच्या ओळखी झाल्या होत्या. पण त्यातील हर्बर्टच्या ती जास्त जवळ पोचली होती.

एकदा हर्बर्ट बसमध्ये बसून नवीन फेरीची वेळ सुरु होण्याची वाट बघत होता. मेरी त्याची नेहमीची उतारू होती. त्यामुळे ते भेटले, की एकमेकांकडे बघून मान हलवीत, हसत व शुभ प्रभात म्हणत. पण आजच्या सकाळी हर्बर्टला काहीतरी झाले होते. सहसा तो उदास डोळयांचा ज्यू असे. त्याला मेरी त्याला थोडासा बधिर/गोंधळलेला म्हणे. त्यामुळे तो कुरूप रोनाल्ड कोलमनसारखा दिसे. त्याचे उदासी रेंगाळणारे हास्य सुंदर होते. पण आज सकाळी तो राक्षसी वाटत होता. जेव्हा मेरी बसमध्ये शिरली, तेव्हा त्याने तिला न पाहिल्याचे ढोंग केले. तिने नाजूकपणे खिडकीच्या काचेवर टकटक केले, तेव्हा त्याने कळ दाबल्यावर उघडणाऱ्या दाराला स्पर्श करण्याऐवजी, त्याने त्याच्या बोटांच्या नखांकडे खाली पाहिले व त्याच्या पँटवर घासून त्यांना उजाळा देण्याचा बहाणा केला. मेरीने परत टकटक केले पण यावेळी हर्बर्टने त्याच्या घड्याळाकडे पाहिले. हसला व बस चालू करायला सुरु केले पण ती सुरु केली नाही. मेरीने दारावर जोराने आवाज केला. आणि आता पहिल्यांदाच तिची चाहूल लागल्याचे भासवून, हर्बर्टने दार उघडले.

त्याच्याकडे बघत मेरी बोलली, “तू!

तो हसून “शुभ प्रभात” म्हणाला.

तो इतका सहजतेने व नम्रपणे बोलला, की संशय घ्यावा की नाही, ते मेरीला कळेना. पण दुसऱ्या दिवशी सकाळीही हर्बर्ट तसाच वागला. तेव्हा मेरी म्हणाली, “काही लोक एका डोळयाने आंधळे असतात व दुसऱ्या डोळयाने

बघू शकत नाहीत. मला नवल वाटते, त्याना बस चालवायची नोकरी कशी मिळते.”

“तू माझ्याबद्दल बोलते आहेस का?”

“तुला लागू पडत असेल, तर हो. काही लोक ऐकण्याच्या बाबतीत इतके बेपर्वा असतात, की त्यांनी ऐकायचे मशीन लावलेलेच बरे.”

“तू काय म्हणते आहेस, ते मला कळत नाही.”

तिसऱ्या दिवशी सकाळी मेरी बसच्या दाराशी चालत गेली, पण दारावर टकटक केले नाही. यावेळेस हर्बर्टने तिला मिनिटभर थांबवून ठेवले. मग त्याच्या डावीकडे आकाशात एक काल्पनिक विमान बघत, त्याने मेरीचे लक्ष विचलित केले, जेणेकरून तीदेखील आकाशात बघेल. आणि त्याच क्षणी त्याने दार उघडले. तो वळला आणि हसत सुटला. पैसे पेटीत टाकत मेरी म्हणाली, “हा काय विनोद आहे!”

पुढील दिवशी तिने त्याला मूर्ख बनवायचे ठरवले. बसच्या दाराशी जाण्याऐवजी, ती सरळ चालकाच्या समोरील काचेसमोर जाऊन वर्तमानपत्र वाचत उभी राहिली. त्याने तिला पूर्ण दोन मिनिटे शांतपणे वाचून दिले. नंतर तो जोराने पों पो करू लागल्यावर तिने उडी मारली.

ती किंचाळली, “येडपट!” तिला आत जाऊन त्याच्या डोक्यावर टप्पल मारायची होती. पण तो दार न उघडता, तिथे हसत बसला. जेव्हा तिचा राग कमी झाला, तेव्हा तिने ठरवले, की आज हर्बर्ट चालवत असलेल्या बसने जायचे नाही. ती बसथांब्याच्या लाकडी बाकावर बसली आणि वर्तमानपत्र वाचू लागली. हर्बर्टने दार उघडले पण मेरीने वर्तमानपत्रातून डोके वर काढले नाही. हर्बर्टला काळजी वाटू लागली. तिने फक्त रागावून तो चालवत

असलेल्या बसमधून न जाण्याचे ठरवले, एवढेच नाही, तर त्याने मिनिटभर बस चालू ठेवली, तरी ती उठेना. त्याने बाहेर येऊन तिची क्षमा मागितली.

तिने त्याची क्षमा धिक्कारली. "मी पुढच्या बसने जाईन आणि मी तुझ्याविरुद्ध तक्रार करणार आहे. नक्कीच मी ती करेन."

"तू ते करणार नाहीस. का करशील? तुला माहिती आहे, तो फक्त विनोद होता."

"आणि तू त्याचा फायदा घेतलास. कारण तुला माहिती होते, की मी तुझ्याविरुद्ध तक्रार करणार नाही."

'पहिले म्हणजे, जर मला माहिती असते, की तू माझ्यावर आगपाखड करणार, तर मी कधीच तुझी गंमत केली नसती. म्हणजे मला म्हणायचे आहे, की ती फक्त गंमत होती."

"तो भसाडा पों पो आवाज काही गंमत नव्हती. त्याने मला घाबरवले."

"मी खरेच क्षमा मागतो. नम्रपणे क्षमा मागतो. चल, आत बस."

तिने कां कू केले. मग म्हणाली, "ओहो, ठीक आहे. पण विनोद थांबव. तुझ्यासारखीच माझीही नोकरी आहे."

ती बसमध्ये चढली व पर्स उघडून पैसे काढू लागली.

"नको. आज माझ्याकडून तुला ही फेरी आहे. आता रोज सकाळी ही माझ्याकडून तुला भेट समज. मला ते आवडेल."

मेरी म्हणाली, 'याने माझा राग जाणार नाही. मी तुला ओळखत नाही."

"मी जाणतो. तुझे नाव काय आहे? मला ते सुद्धा माहिती नाही."

“तुला माझे नाव का जाणून घ्यायचे आहे?”

“माझे नाव लेविस आहे. हर्बर्ट लेविस. जर तुला कधी हाक मारायची झाली, तर हे माझे नाव आहे.”

“तुला असे म्हणायचे आहे का, की तू तुझे हे आचरट विनोद यापुढेही चालू ठेवणार आहेस? पण माझी सहनशक्ती आता संपली आहे.”

“हे फक्त तोचतोचपणा घालवण्यासाठी होते. आणि मला वाटते, तू ते खेळीमेळीने घेणारी आहेस. याने मी ताजातवाना झालो.”

तिने बसचे भाडे भरले व अजून संभाषण नको म्हणून, बसच्या मागील बाजूला जाऊन बसली. तो इतर कुणा उतारूंना शुभेच्छा देत नव्हता. त्यावरून तिच्या लक्षात आले, की तो चांगलाच गुरफटला जाऊन अस्वस्थ झाला होता.

सबवे स्टेशनशी सोयीस्कर असलेल्या मधल्या दाराने उतरण्याऐवजी, ती बसच्या पुढेपर्यंत चालत गेली. आणि उतरता उतरता वळून त्याच्याकडे बघून हसली व म्हणाली, “अच्छा.” तिने रस्ता ओलांडला व स्टेशनात शिरली. तिला त्याचे डोळे तिच्याकडे लागलेले जाणवत होते. तो कसा दिसत होता, हेदेखील तिला समजत होते.

पुढचे काही दिवस अजून काही विनोद झाला नाही. पण मृदु हास्याची देवाणघेवाण झाली. मेरीने तर्क केला की तिच्यासारखाच तोदेखील तिच्या सकाळच्या नजरभेटीची वाट बघत असतो. हेच खूप होते. आता ती बसच्या पुढील बाजूला त्याच्याजवळ बसू लागली. अशा तऱ्हेने त्यांनी एकमेकांबद्दल जाणून घेतले, की तो विवाहित होता. त्याला दोन मुले होती. ३- अ जॅकसन हाईटमध्ये तो रहात होता. तो पाठलाग करून त्रास देणारा होता. त्याने तिला हेदेखील सांगितले, की त्याला वैद्यकीय शिक्षण घ्यायचे होते. त्याने

लहानपणी दोन वर्षे पियानोचे धडे घेतले होते. सहा महिन्यांसाठी धूम्रपान सोडले होते.  त्याचे वजन इतके वाढले, की त्याला त्याचे कपडे होईनात. त्याचा भाऊ नाविक दलातील किनाऱ्यावरील नोकरी करत होता. त्याला सिनेमे बघणे म्हणजे वेळेचा अपव्यय वाटे. त्याच्या बायकोची बहीण व तिचा नवरा यांच्याबरोबर ते दोघे सिनेमाला गेले होते. पण त्याला लोकांना भेटणे आवडे. मेरीनेही त्याला माहिती दिली, की तिने क्युबाला जहाजावरील सफर केली होती. कोकमध्ये अमोनिया घालून ती आराम अनुभवत असे. तिला आयरिशपेक्षा ज्यू मित्र जास्त होते. तिने देखील लहानपणी दोन वर्षे पियानोचे धडे घेतले होते. बाहेर गेल्यावर तिला भाजलेले वा तळलेले गाईचे मास आवडे पण घरी नव्हे. ती बारा वर्षांची असतांना तिला जोगीण व्हायचे होते. ती तिच्या आईबरोबर व तीन बहिणींबरोबर बस सुटण्याच्या जागेपासून दिसणाऱ्या रो हाउसमधील चौथ्या घरात रहात असे. काही आठवड्यात त्याना प्रेमात पडण्यासाठी, एकमेकांबद्दल जे माहिती व्हायला हवे होते, ते माहिती झाले. आणि कळत नकळत प्रथम कोण पुढाकार घेतो, याची ते वाट बघू लागले.

एका सकाळी मेरी त्याला म्हणाली, "जर तुला जायचे असेल, तर मी तुला मंगळवारच्या रात्रीच्या खेळाची दोन तिकिटे देऊ शकते."

"म्हणजे पासेस का?"

"होय रे, माझ्या वरिष्ठा. शुक्रवारी नवीन सिनेमा लागतो आहे. टीकाकारांनी बघण्यापूर्वी त्याना तो ब्रुकलव्हन एडिसनच्या लोकांनी बघितलेला आवडतो. मला वाटते अशा तऱ्हेने आम्हाला नेहमी पासेस मिळत असतात., तो बहुधा 'बॉन्डचा पाव' नावाचा सिनेमा आहे. फुकट तिकिटे, ठरलेल्या जागा आणि सर्व काही उद्‌घाटनाच्या रात्रीसारखे. पण

टीकाकारांना परवानगी नाही. आम्हाला फक्त रसिकांची प्रतिक्रिया हवी आहे. लोकांसमोर रंगीत तालीम केल्यासारखे. म्हणजे ते सांगू शकतील, की कुठे हसू येते आहे, कुठे काही कापाकापी करायला हवी आहे, इत्यादी. तू तुझ्या बायकोबरोबर जाशील का?”

“मेरी, ऐक, मी माझ्या बायकोचा द्वेष करतो.”

“ओहो, ठीक आहे. तुला माहिती आहे का, मला असे वाटले होते.”

“असे समजू नकोस की मी तुझे बोलणे अव्हेरतो आहे. कारण मी गंभीरपणे तसे करतो आहे. पण तू जा. तुला तुझा वेळ चांगला घालवायचा हक्क आहे. तुझी आवडती व्यक्ती बरोबर घेऊन जा म्हणजे तुझी संध्याकाळ छान जाईल. माझी बायको यात बसत नाही. मी तिच्या पाठीवर काही बोलत नाही. सगळ्यांना हे माहिती आहे. आणि पहिल्यांदा ही तिचीच कल्पना होती. मला ती आवडेनाशी झाली, त्यापूर्वीच मी तिला आवडेनासा झालो होतो. ती फक्त मुले --- आ --- हा! मी फक्त दयाळू हावभाव करतो व माझे तोंड बंद ठेवतो. पण कधी कधी ते उघडतो. कारण मेरी, मी तुझ्यावर प्रेम करतो. मी बदलत चाललो आहे. खेचला जातो आहे. मी जेव्हा मूर्खासारखे बोलतो आहे, तेव्हा मी तुला हेदेखील सांगू शकतो. मला काही बोलायची गरज नाही. तुझ्यावर काही जबाबदारी पडणार नाही. मी तुझ्यावर प्रेम करतो, म्हणून तू असे समजू नकोस की तुझ्यावर काही जबाबदारी पडेल. पण मी माझा स्वतःचा छळ करून घेणे आणि आता पिणे, हे थांबण्यासाठी म्हणून मी त्यांच्याकडे मला दुसरे प्रेम करायला परवानगी मागतो आहे.”

“अस्स! तू असा कधी बदललास?”

सोमवारी रात्री एका मित्राबरोबर मी फॉरेस्ट हिल्समध्ये गेलो होतो --- तो जवळ रहातो. ते त्याच्यासाठी सोयीस्कर आहे. सोमवार रात्रीपासून एक

आठवडा झाला. देवा, मी दिवसभर तुझ्याबद्दलच विचार करत असतो. माझी बायको ठीक आहे. पण या जगातील खूप लोक दुःखी आहेत. तू काहीच बोलत नाहीस. ठीक आहे. तू काय विचार करत आहेस, ते मला माहिती आहे.''

''तसेही तू म्हणतोस, तू विचार करत नाहीस. पण मला विचार केला पाहिजे.''

''नाही. तू तो करू नकोस. मी तुला सांगितले, की तुझ्यावर काही जबाबदारी पडणार नाही. मी तुला फक्त माझ्या समाधानासाठी सांगितले.''

''हर्बर्ट, तू इथे चुकतो आहेस. माझी जबाबदारी आहे, की तुला पहिल्यांदा बोलू द्यावे. जर तू काही बोलला नसतास, तर मी काही बोलले असते. किंवा काही करून तरी दाखवले असते. ठीक आहे. आपण ते उघड तर केले.

''हो, मला असे वाटते. काही झाले, तरी आता आपल्याला माहिती आहे.''

# डॉक्टर आणि मिसेस पार्सन्स



मागील उन्हाळयात, काही आठवडे जेव्हा आलेल्या पाहुण्यांमुळे गावाची लोकसंख्या तिप्पट वाढली होती, तेव्हा डॉक्टर पार्सन्स यांनी त्यांच्या संध्याकाळच्या कामानंतर जो पेकला बोलावले. त्यामुळे त्यांना थोडी विश्रांती घेता आली. जोचे घर समुद्रकिनाऱ्याजवळ होते. क्लबजवळ नव्हते. तो लग्न न केलेला माणूस असून, त्याच्या बहिणीबरोबर सुमारे वर्षभर रहात होता. तीस वर्षांपेक्षा अधिक काळ माहिती नसलेल्या लोकांना त्यांच्याकडे येण्यासाठी, ते उत्तेजन देत नसत. फोनने त्रास न दिल्याने डॉक्टर पार्सन्स सोफ्यावर अडवारले. एक दुःखी आई तिच्या आजारी मुलाला घेऊन एका रात्री तिच्या गाडीने डॉक्टर पार्सन्स यांची गाडी शोधत आली. जर संध्याकाळी डॉक्टर त्यांच्या दवाखान्यात नसतील, तर ते जो पेकच्या घरी असतील, असे तिला झटपट सांगण्यात आले. डॉक्टरांची पुढची खेळी अशी होती, की जुन्या

सुनसान अशा दुरुस्तीच्या पलीकडे गेलेल्या मेडबरी इस्टेटमधील तबेल्याच्या मागे गाडी लाऊन, एक डुलकी काढायची. एका रात्री गावातील पोलीस, हॅरी रोसिनीने त्याला हळूच जागे केले. "डॉक, आपल्याकडे फार मोठा अपघात झाला आहे. तीन गाड्या एकमेकांवर आपटल्या. एक मूल आधीच दगावले आहे."

"मला कुठे शोधायचे, ते तुला कसे कळले?"

"डॉक, तुम्ही गेले तीन आठवडे इथे येत असल्याचे मला माहिती होते. मी तुम्हाला झोपू दिले असते, पण --- "

"हॅरी, ठीक आहे." यावेळी डॉक्टर पार्सन्सला रडायचे होते.

डॉक, जर सूर्याने भाजल्याची केस असती तर मी तुम्हाला उठवले नसते. पण त्या एका गाडीखाली अजूनही दोन मुले चिरडलेली आहेत."

"हॅरी, मी समजू शकतो."

"त्यातील एक माझ्या बहिणीचे, थेल्माचे, मूल आहे."

डॉक्टर पार्सन्स म्हणाले, "अरे देवा! ठीक आहे. आपण जाउया --- हॅरी, मला वाटते आठवड्यातून दोन तीन रात्रींसाठी तू मला एखादी निवांत जागा शोधून देऊ शकशील."

"मी ते करू शकेन. मी ते करेन. माझ्याकडे एक निवांत जागा आहे."

सप्टेंबर आला, पण लोकसंख्या सर्वमान्यपणे होते, तितकी कमी झाली नाही. उन्हाळ्यात इथे आलेल्या बऱ्याच लोकांना गावात घरे मिळण्याची समस्या आली. बाकी काही स्त्रिया पती व मुले सैन्यातून बाहेर पडायची व त्यांच्या उन्हाळ्याच्या घरी खरीखुरी विश्रांती घेण्याची वाट बघत होत्या. पूर्ण उन्हाळाभर इथे रहायचा विचार, फार थोडे लोक करत होते आणि

फारच थोडे प्रत्यक्ष राहिले. भारतीय उन्हाळा फारच सौम्य होता. अंशतः बंदिस्त घरांमध्ये राहून सतत जुने कपडे घालण्यात एक प्रकारची मजा होती. काही न ठरवता दिलेल्या मेजवान्यांमध्येदेखील मजा होती. नव्याने झालेल्या वडिलांना त्यांच्या बाळांशी ओळख करून घेण्याची संधी मिळाली. त्यापैकी काहीजणांनी प्रथमच त्यांच्या मुलांना पाहिले. पण डॉक्टर पार्सन्सना ती चांगली माहिती होती. त्यांना पालक चांगले माहिती असल्याशिवाय ते मुलांची वा त्यांच्या पालकांची नावे लक्षात ठेवण्यात माहीर होते, असे म्हणता येणार नाही. खिशात शिफारस करायच्या कोऱ्या कागदांचा गठ्ठा घेऊन, ते त्यांच्या दवाखान्यात परत आले. त्यावरील त्यांचे काही शेरे असे होतेः ‘एड रॉजर्सच्या घरात रहाणारी साधारण २४ वर्षांची जाड मुलगी’, ’घटसर्प झाल्याने घसादुखी असणारे १६ महिन्यांचे मूल’ जेव्हा त्यांना एखाद्या घरी बोलावले जाई, आज तेथील लहान मुलाची तब्येत कशी आहे, हे विचारले जाई, तेव्हा तेथील स्वयंपाकीण त्यांची रुग्ण असण्याचे आश्चर्य अलीकडे त्यांना वाटेनासे झाले होते. अशा घरातील बाईच्या [ वैद्यकीय क्षेत्राची माहिती असण्याची शक्यता असलेली, आधुनिक तरुण स्त्री ] डोळ्यातील भाव अशा प्रकारे नावड दाखवणारे असत, की म्हातारपणामुळे त्याची मानसिक अवस्था बिकट झाली आहे वा तो प्यायलेला आहे. त्यांना तो आवडला नाही, तर ते दुसऱ्या डॉक्टरला बोलावत. अर्थात तिथे दुसरा डॉक्टर नव्हता. जेस विलीयमसन तीन वर्षे सैन्यात होता. आणि वीस मैलांच्या परिसरातील दुसरेही असेच होते.

डॉक्टर पार्सन्स यांची प्रॅक्टीस गेली तीस वर्षे स्वप्नवत होती. पण मागील उन्हाळ्यापासून व त्यामागील थंडीपासून, ती फारशी चालत नव्हती. ४२ मधील  पानगळीपासून, तो लॉजच्या सभेसाठी, बँक संचालकांच्या किंवा देशातील वैद्यकीय समाजाच्या एकत्र येण्याच्या सभेसाठी, जात होता. तसा

वयामुळे तो विकल परिस्थितीत नव्हता. तिथे कदाचित तो लोकांच्या नजरेतील आदराला धक्का न लागता पिऊ शकत असे. त्याचा गाडीचालक म्हणून काम करणाऱ्या मोठ्या मुलांना तो ओरडत असे. त्या मुलांना गाडी रात्री घरी घेऊन जायची असे.  संरक्षण खात्यात त्यांची बदली झाली तेव्हा स्वयंपाकीण ऱ्होडाने काम सोडले. त्यामुळे जरी, मिसेस डॉक्टर पार्सन्स, जसे सगळेजण त्यांच्या बायकोला म्हणत ,स्वयंपाक व घरातील इतर काम करावे लागे. तरी ती लोकांना सांगे, की ती त्यांची पूर्णपणे आभारी आहे. त्यामुळे तिला डॉक्टरांची पुस्तके वाचण्याव्यतिरिक्त काही काम करायला मिळाले. तिला स्पर्श करू शकणाऱ्या माणसाव्यतिरिक्त इतर सर्वांपासून तासनतास ती दूर एकटी पडलेली असल्याने, तिच्या हातांना काही काम मिळाले, तेव्हा तिला बरे वाटले.

हॅरी रोसिनीने डॉक्टर पार्सन्ससाठी शोधलेली तुरुंगातील निवांत जागा तिला माहिती होती. हॅरीने त्याचे वचन पाळले. तरीही त्याची भाची, थेल्माची मुलगी, तो हादसा घडला, तेव्हापासून, बरी झाली नव्हती. लपायची जागा त्यावेळच्या जगातील सर्वात मोठ्या असलेल्या वालडॉर्फ ॲस्टोरियासारखी नसली, तरी ती छान होती. ती विशिष्ट जातीतील कायदा मोडणाऱ्या स्त्री कैद्यांसाठी असलेली जागा होती, जी फारशी वापरायची वेळच येत नसे. त्यामुळे डॉक्टर पार्सन्ससाठी ती आदर्श होती. आतापर्यंत तिथे फक्त काही दारूबाज स्त्रियांना ठेवण्यात आले होते. फक्त गेल्या तीस वर्षात मिसेस पार्सन्सना एवढीच भीती होती, की कुण्या आगाऊ कैदी स्त्रीने त्यांच्या नवऱ्यावर भूल घालून त्याच्याशी लग्न करू नये.

तुम्ही काळजी करावी पण कधीच अती करू नये. न्हाव्याने रोज दाढी केल्यासारखी काळजी करू नये तर फिलाडेल्फिया, पेनसिल्व्हियामधून

चालतांना, बेन्जामिन फ्रँकलीनसारखे जसे त्याचे केस फार वाढलेले दिसू लागले की तो काखेत पाव धरून, करत असे, तशी कधीतरी करावी.

डॉक्टर पार्सन्ससाठी कोटातील त्याला जरुरीच्या वाटणाऱ्या चेनवाले घड्याळ, चेनवाला तापमापक, पेन, पेन्सिल व इतर काही वस्तू या नेहमीच्या कोटात असत. जेव्हा बागेतील मेजवानीसाठी त्याला पांढरा सुती कोट घालावा लागे, तेव्हा तो या वस्तू त्यात ठेवण्याचे काम फार त्रासाचे वाटल्यामुळे, टाळत असे. जसे तो जुना, काचेला तडा गेलेला चष्मा बदलून, नवीन घेत नसे, जसे तो एक मिनिट, म्हणजे साठ सेकंद घालवून, जिच्या सोळा महिन्याच्या बाळासाठी विषारी परिणाम कमी करणाऱ्या बाईचे नाव लिहित असे, तसेच  वीस हजार मापाच्या गोळयांची जरूर असलेल्या जाड्या तरुण बाईचे नावही लिहित नसे. जर डॉक्टरला काळजी करायला मुलेच नसतील, तर डॉक्टरची काळजी करणे योग्य नव्हते का?

एकदा डॉक्टर पार्सन्स खूप हसत, घरी आले. हा ख्रिसमसच्या आसपासचा दिवस होता. तो कधी स्वयंपाकघराच्या दाराजवळ येत नसे, पण आला. सहसा जिथून त्याच्या दवाखान्यात जाता येई, अशा तो कडेच्या दाराने तो येत असे. हे दुपारनंतर थोड्या वेळाने झाले. मिसेस पार्सन्सने स्टोव्हवर भाज्यांचे सूप ठेवले होते आणि ती वर्तमानपत्र वाचत होती. ती म्हणाली, “वा!

तो बोलला, “ठीक आहे. ठीक आहे. ठीक आहे. काय मूर्खपणा आहे!”

“अचानक तुला इतके खूष व्हायला काय झाले?”

तो कोट, टोपी काढत,म्हणाला, “काही फोन आले का?”

“काही फोन? काय झाले आहे? तुझी लोकप्रियता कमी होते आहे, असे तुला वाटते आहे का? सात आठ फोन आले होते. ते सर्व क्रमांक तुझ्या टेबलावरती आहेत. तुला झाले आहे तरी काय?”

तो म्हणाला, “माझी लोकप्रियता कुठल्याही क्षणी नष्ट होणार आहे. जेस विलीयमसन घरी परत येतो आहे.” त्याने खुर्चीवर बसून बूट काढत म्हटले.

“जेस विलीयमसन?”

“तो सैन्यातून बाहेर पडून, घरी येतो आहे. त्याने अंगावर गणवेषही घातलेला नाही. तो छान दिसतो आहे. कामाला लागायच्या तयारीत दिसतो आहे.”

“तो इतक्या लवकर कसे काय काम सुरु करू शकेल? त्याला काही समजले आहे का?”

“आता, आता. त्याने पक्का निर्णय घेतला आहे --- तो नोकरीतून निवृत्त होऊन व उत्तर कॅरोलीनातील त्याच्या बायकोच्या कुटुंबाला भेटून येतो आहे. तो आरामात गोल्फ खेळत व इतर गोष्टी करत, येतो आहे. आता पैसे मिळवायचा त्याचा विचार आहे.”

“ठीक आहे. हे नवलपूर्ण आहे. तो हे सर्व केव्हा सुरु करणार आहे?”

“लगेच. मी त्याला दुपारी फोन करणार आहे. मी त्याला सांगणार आहे, की त्याचे सर्व काही लागी लागेपर्यंत, तो माझा दवाखाना वापरू शकतो. मी त्याला हेदेखील सांगितले आहे, की तो आणि त्याची बायको तोपर्यंत आपल्या घरी राहू शकतात. आपल्याला कुठे जायचे असेल, तर पुढील आठवड्यात आपण जाऊ शकतो.”

“व्यक्तिशः मला वाटते आपण कुठेतरी जायचे म्हणून जाऊ.”

डॉक्टर पार्सन्स म्हणाले, “मलाही तसेच वाटते.”

डॉक्टर आणि मिसेस पार्सन्स न्यू इंग्लंडला गेले. तिथे मिसेस पार्सन्सच्या भावाने चालवलेले छानसे हॉटेल होते. ते सकाळी नऊ/दहापर्यंत झोपणार होते. न्याहारी खोलीतच घेणार होते. पाहिजे तेव्हा जुन्या मित्रांना भेटणार होते. दुपारी सिनेमे बघणार होते. आणि जेव्हा त्याना वाटेल, तेव्हा बांधाबांध करून घरी परतणार होते.

जेव्हा ते घरी परततील, तेव्हा ते अर्थात तोपर्यंत त्यांच्या स्वतःच्या घरी स्थिरस्थावर झालेल्या विलीयमसनला फोन करतील. पार्सन्स मंडळींच्या स्वागतासाठी मिसेस विलीयमसन फुले रचून ठेवेल आणि फोनवर त्यांचे आभार मानेल.

डॉक्टर पार्सन्सने डॉक्टर विलीयमसनला सर्व काही जुळून येते आहे का, हे विचारायला फोन लावला. डॉक्टर विलीयमसन मजेत त्याची प्रॅक्टीस करत होता. तो बँकेच्या सभेचा दिवस होता. डॉक्टर पार्सन्सना एकदाचे मोकळे वाटत होते. त्यांच्या सुदृढ दिसण्यामुळे बरोबरील संचालकांनी मारलेल्या शेऱ्यांमुळे त्यांना छान वाटत होते. दुसऱ्या रात्री ते लॉजच्या सभेला गेले. तिथे त्याना आतील पासवर्ड माहिती नसल्याने, नको ते शेरे ऐकावे लागले. [जे खरे तर त्यांना माहिती होते.] आठवड्याच्या शेवटी ते फारच थोड्या ओळखीच्या लोकांना व मित्रांना भेटले. पण त्यांच्याकडे दहा बाराच रुग्ण आले. त्यांना याचे आश्चर्य वाटले. आणि नंतर त्याना त्याचे स्पष्टीकरण मिळाले. सगळ्यांना वाटले, की ते अजून बाहेरगावी आहेत. त्यामुळे त्यांना वर्तमानपत्रात जाहिरात द्यावी लागली, ‘डॉक्टर पार्सन्स गावाहून परतले असून त्यांनी प्रॅक्टीस सुरु केली आहे.’ त्या शुक्रवारी दुपारी वर्तमानपत्र प्रसिद्ध झाले आणि डॉक्टर पार्सन्स शुक्रवारी संध्याकाळी लवकरच दवाखान्यात दाखल

झाले. सामान्यपणे त्यांचे कामाचे तास सहा ते आठ असले, तरी ते त्या दिवशी सहा ते नऊ तिथे होते. पण एकही रुग्ण आला नाही.

ते त्यांच्या हॉलमध्ये परत आले. तिथे त्यांची बायको रेडिओवर गाणी ऐकत, शिवणकाम करत होती. तो म्हणाला, “आज सारे शांत शांत होते.”

ती म्हणाली, “हो, किती छान सुटका!”

“युद्धापूर्वी असायचे तसे मला वाटते, फार शांत. आता मी हे मनाला फार लावून घेणार नाही. विलीयमसन इथे आल्यामुळे, मी आता नवीन रुग्ण घेणार नाही.”

मिसेस पार्सन्स म्हणाली, “मी हे सुचवणारच होते. आता तुम्ही ते का घ्यावे?”

“आता मी सर्व जबाबदारी विलीयमसनच्या खांद्यावर टाकणार. पण मला अजून काही गोष्टी करायच्या आहेत, त्या मला का करता येऊ नयेत? उदाहरणार्थ, दर दोन/तीन आठवड्यांनी न्यूयॉर्कला फक्त रात्रभर जायचे आणि काही  निष्णात डॉक्टरांना काम करतांना बघायचे आहे.”

“आपण दोघेही जाऊ शकतो. दर एका आठवड्याने तुम्ही दवाखान्यात जा व मी --- खरेदी करेन. किंवा सकाळचा सिनेमा बघेन. ते छान ठरेल.”

डॉक्टर पार्सन्स बोलले, “मी याबद्दल जितका जास्त विचार करतो, तितकी ती छान कल्पना असल्याचे मला वाटते.”

“मला वाटते, ही फारच छान कल्पना आहे.”

डॉक्टर पार्सन्सनी त्या आठवड्याचा टाईम्स घेऊन, काही मिनिटे पाने चाळली. “काही म्हण, पण मला नवल वाटते. मला वाटते लवकरच आपण

विलीयमसन व त्याच्या बायकोला रविवारी रात्री जेवायला बोलावू. त्याला सगळे तरुण लोक माहिती आहेत. पण धर्मगुरू मॅक्कीट्रीडज, त्याची बायको, वकील म्युलडून व त्याची बायको --- हे लोक त्याला चांगले माहिती असतील.”

“हं.”

तो मासिकातील लेखाकडे वा तत्सम कशाकडे तरी वळला .ते वाचले. मासिक बंद केले. आपण पत्ते खेळू या का?”

ती बोलली, “ठीक आहे. तुम्ही टेबल लावा. तोपर्यंत मी माझे शिवणकाम पूर्ण करते.”

त्याने टेबल व सरळ पाठीच्या खुर्च्या बाहेर आणल्या. त्याने पत्ते पिसून काटण्यासाठी ठेवले. तिने तिचे पत्ते उचलले. त्याने त्याचे उचलले व तिला बघण्यासाठी धरले. त्याने तिच्याकडे बघितले, तर ती त्याच्या पत्त्यांकडे बघत नव्हती. तिच्या डोळ्यात काळजी उमटली होती --- काळजी, अगदी सरळ ते दिसत होते. त्याला हसण्याशिवाय काही सुचेना.

त्याने विचारले, “मी कोणाला फसवतो आहे? अं --- ?” त्याने विचारले व तो हसला.

आता ती पण हसली.

# THE MOCCASINS

# मऊ चामड्याचे बूट



एका घराच्या हॉलमध्ये अर्धवट अंधारात सुमारे वीस माणसे बसली होती. गॅलरीत अजून अंधारात काहीजण बसली होती. पण ते दोन आणि चारच्या गटात होते. ते हळू आवाजात बोलत होते, किंवा गप्प होते. त्यामुळे ती काही मेजवानी वाटत नव्हती. लहान गटात जसा एकच आवाज येतो, तसे इथे नव्हते. पूर्ण गोंधळ होता. त्यात अजून काही वेगळे होते. त्यात एकत्रितपणे अपेक्षा करण्यासारखे काही नव्हते. साधी भाषा किंवा दोन भाषांचे मिश्रण नव्हते. मेरीला वाटले, तिला दोन्ही जाणवते आहे. जसे काही लोक सभोवताली बसले आहेत, पहुडले आहेत. कशाची तरी वाट पहात आहेत. पण विशेष काही होण्याची, असे नव्हे. बरीच रात्र झाली होती. एक बाई

सोडून, सर्व सूर्याच्या उन्हाने खूप रापलेले लोक! त्यातील अर्धे खेळल्यामुळे, तसे झाले होते. ते दमलेही होते. जेव्हा निग्रो घरमालकाबरोबर मेरी आणि तिचा भाऊ हॉलमध्ये आले, तेव्हा कोणीही माणसे उठून उभी राहिली नाहीत. हवाईयन रंगीत शर्ट घातलेला धट्टाकट्टा, जाड माणूस वायरचे ब्रश मऊपणे वाजवत, रेडिओ फोनोग्राफवर डोरसे ब्रदर्सच्या रेकॉर्ड केलेल्या संगीताच्या तालावर मोठ्या जाणकारीने, ताशा बडवत होता. तो सर्वात जास्त रापलेला होता. छातीपासून अर्ध्या चड्डीपर्यंत आणि पायांपासून छोट्या मोज्यांपर्यंत, तो रापलेला भाग दिसत होता. तो हसे आणि वायरचा ब्रश आनंदाने हलवे. पण न थांबता वाजवत राही. मेरी आणि तिच्या भावाच्या येण्यापेक्षा 'प्रेमाची निळी खोल भावना' या धूनमध्ये त्याला जास्त रुची होती.

उन्हाने न रापलेली एकमेव बळकट, सोनेरी केसांची बाई मेरी आणि जॅकचे अभिनंदन करायला आली. तिचे हास्य नम्र व झटपट होते. आणि ते भेटी देणारे नव्या लोकांची ओळख सांगत होते. जर ओळख समाधानकारक नसेल तर, नवीन लोकांना हाकलून दिले जात होते.

तो म्हणाला, "मिसेस फॉदरगिल, मी जॅक ट्रेसी आहे आणि ही माझी बहीण मेरी आहे."

लगेच तिच्या चेहऱ्यावर हास्य पसरले. "ओहो, हो. का? हो. मी फार खूष झाले. कार्ल शेफर्डने तुम्हाला पाठवले आहे, नाही का?"

जॅक म्हणाला, "हो, त्यानेच."

ती बोलली, "ठीक आहे."

त्याने सभोवताली पाहिले. पण मंद प्रकाशात, त्याला कुणी ओळखेना.

"तो इथे आहे?"

“नाही. तो इथे नाही. अजून तरी तो इथे नाही. पण त्याने होब साऊंडहून फोन केला आहे. तो येतो आहे आणि आम्ही --- मी आणि माझा नवरा --- डॉक, तुझी अपेक्षा करत होतो.”

तिने ताशा वाजवणाऱ्या माणसाला बोलावले.

त्याने संगीताच्या तालावर मान डोलावली आणि बोलला, “येतो आ – हे, आ --- ई.” रेकॉर्ड संपली आणि तो तिघांना येऊन मिळाला. तो झटपट हलला. तिथून पळून जाण्याइतकी शक्ती त्याच्यात नव्हती. त्याचा आविर्भाव बायकी होता. तो आखडल्यासारख्या हालचालीने सावकाश पाऊले टाकत होता. त्याचे हात मोठे असून, त्याची पकड मजबूत होती. मग तिथे एक विरोधाभास घडला. रॉकेन या नॉर्वेजियन फुटबॉलपटूच्या सुरवातीच्या काळात किंवा मृत ह्युगो बेझडेक याच्या शेवटच्या काळात, तो चांगल्यापैकी रक्षक होता. त्याचे विरळ करडे केस, मधोमध भांग असलेले होते. तो गटाची बांधिलकी असल्यासारखा वाटत होता. त्याच्या बायकोने ट्रेसीची ओळख करून दिली. त्याने एक हात जॅकच्या खांद्यावर टाकला आणि दुसरा मेरीच्या उघड्या खांद्यावर टाकला.

तो म्हणाला, “कार्ल कुठल्याही क्षणी इथे येत जात असेल. पण देवाला नैवेद्य म्हणून दाखवलेल्या पेयापासून स्वतःला वंचित करण्यात काय अर्थ आहे? तू त्याला नाव दे आणि आपण ते पिऊ. माझे स्वतःचे असे क्रशर नावाचे लहानसे पेय आहे.” तो जिवणी रुंदावत हसला.

मिसेस फॉदरगिल म्हणाली, “डॉक, आता?”

मेरीने विचारले, “क्रशर म्हणजे काय?”

“तुला स्वतःला ते करून बघायला आवडेल का?”

मेरी म्हणाली, “मला स्कॉच घ्यायला आवडेल.”

डॉक बोलला, “अरेच्च्या, म्हणजे खास काही आवडीनिवडी नाहीत?”

मेरी म्हणाली, “तसे म्हणा हवे तर! --- “

डॉक बोलला, “हे जास्त ठीक झाले. मिस्टर ट्रेसी, तुमचे काय?”

जॅक म्हणाला, “मी बोर्बोर्न आणि सोडा पसंत करेन.”

डॉक बोलला, “तू बोर्बोर्न पितो आहेस, हे तुझे कदाचित बरोबर असेल. मला वाटते तू शून्यातून सुरवात केली असावीस.”

मेरी म्हणाली, “मी तसे केले आहे.”

“तर मग तू डॉ फॉदरगिलबरोबर ये आणि क्रशर कसे बनवायचे ते शिक. मिस्टर ट्रेसी, तुम्ही मदरगिलबरोबर जा व त्या बायकांना मेजवानी द्या.” त्याने मेरीभोवती त्याचा हात टाकला व तिला इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ असलेल्या बंदिस्त जागेतील बारमध्ये नेले.

मेरी म्हणाली, “फॉदरगिल व मदरगिल, हे छान आहे.”

तो हसला. मला माहिती नाही, की निदान या पिढीत हा विचार कुणी केला नाही. अर्थात हा मी जिथून आलो, त्या पश्चिम व्हर्जिनिया मधील हा जुना कौटुंबिक विनोद आहे. पण जेव्हा आमचे न्यूयॉर्कमध्ये लग्न झाले, तेव्हा त्यांनी आम्हाला फ्रान्समधील बंदर व सुट्टी घालवायचे मनोरंजन केंद्र कॅनीज इथे आम्हाला हे नाव दिले. कॅलिफोर्निया किंवा इथे, जेव्हा आम्हाला, लवकर किंवा उशीरा, नवीन गर्दी भेटे, तेव्हा कुणीतरी आम्हाला फॉदरगिल व मदरगिल म्हणायला सुरवात केली. शांघाय, भारत, नैरोबी, इथेही.”

मेरी म्हणाली, “तुम्ही सगळीकडे राहिला आहात?”

तो म्हणाला, “खूप ठिकाणी. जवळजवळ सगळीकडे --- सगळीकडे त्याना आम्ही दिसत असू.” बोलतांना त्याने त्याचे पेय मिसळले.

मेरी बोलली, “हे प्रेमघर आहे.”

“ते, ते आहे का? ठीक आहे. फ्रँक आणि हॅझेल यांना माहिती आहे, की कसे रहायचे.”

“कोण?”

“ओहो, तुला फ्रँक आणि हॅझेल, ब्लेलॉक्स, माहिती नाहीत का -? हे घर आमचे आहे, असे समजू नकोस. नाही बाळा. आम्हाला आमचे हे मित्र माहिती आहेत. सेंट लॉरेन्स नदीजवळ सराव करतांना, हॅझेल ब्लेलॉक्सने तिचा पाय मोडून घेतला. म्हणून त्यांनी मदरगिलला व मला खाली येऊन, त्यांच्यासाठी दार उघडायला सांगितले. फ्रेन्च दारूचा घुटका घेईपर्यंत आम्हाला किल्ला लढवायला सांगितला. हो. हॅझेलचा पाय बरा होईपर्यंत, तिथे आम्ही ते त्यांच्याकरता उघडे ठेवले. हॅझेलवर आम्ही खूप प्रेम केले व मान दिला व त्या सुंदर पायाची स्तुती केली --- तिने त्या पायाची महिनाभर काळजी घेतली असेल, अशी आम्ही आशा केली. जेव्हा आम्हाला पाम झऱ्याकडे जायचे असेल, तेव्हा उत्तरेकडे वर आम्ही जाऊ शकू. तिथे त्याचा एक घोट घेऊन, थोडे डोक्यावर शिंपडू.”

तिचा हात डोक्यावर ठेऊन, मेरीने पेयाची चव बघितली. ती हसली. “अजून तरी काही परिणाम नाही.”

“अर्थातच नाही. मी थोडे ताणले, पण फार लावून धरले नाही. आता एक तुझ्या भावासाठी व एक डॉक्टर फॉदरगिलसाठी. मग तू माझ्याशेजारी येऊन बस.” त्याने दोन मोठे उंच पेले व्हिस्की, सोडा आणि बर्फ घालून दिले. त्याने ते संपवत आणले, तेव्हा लांब उघडलेल्या दरवाज्याच्या कोपऱ्यात उभे राहून, एक पुरुष व एक बाई खूप गंभीरपणे बोलत होते. एक बोट किनाऱ्याशी लागतांना मेरी बघू शकली.

डॉक म्हणाला, “तिथे उजेड पाडल्याशिवाय जाऊ नका.”

बाई बोलली, “आम्हाला आमचा मार्ग माहिती आहे.”

डॉक म्हणाला, “एकमेकांभोवती पिंगा घालण्याचा!. नाही. गंभीरपणे --- खरेच उजेड पाडा.”

बझ म्हणाला, “का?”

डॉक म्हणाला, “मऊ चामड्याचे बूट.” [अशा चैनबाज पार्टीमध्ये न शोभणारे, नवखेपणाचे प्रतिक असलेले पारंपारिक बूट] तो बारमध्ये गेला.

तेथील मनुष्याने बाईकडे बघून भुवई उंचावली. ती शहारली, तेव्हा तिच्याबरोबर असलेल्या माणसाने डॉककडून, विजेरी घेतली आणि ते अंधाऱ्या बोटीकडे गेले.

डॉक म्हणाला, “जर तिला तसे वाटत असेल, तर ते प्रेम असले पाहिजे.”

“चला, या.”

मेरी बोलली, “प्रेम मला कधीच तशा अंधाऱ्या जागी जाऊ देणार नाही.”

डॉक म्हणाला, “तुझ्या वयात नाही.”

मिसेस फॉदरगिल आता लक्ष न गेलेल्या एका जोडप्याच्या [मेरीने न्यूयॉर्कमध्ये पाहिलेली तरुण मुलगी व एक दुय्यम दर्जाचा सिनेअभिनेता] बरोबर बसलेल्या जॅकला एक व्हिस्की, सोडा आणि बर्फ घातलेला पेला दिला आणि मग ती आणि डॉक ताशाजवळील खुर्च्यांकडे गेले.

मेरी म्हणाली, ‘तुम्हाला खेळायचे असेल. तर तुम्ही खेळा.”

डॉक मेरीकडे बघत बोलला, “मी नंतर खेळेन. मी तुझ्याबरोबर वाऱ्याच्या झुळुकेचा आस्वाद घेतो.”

मेरी बोलली, “ठीक आहे. माझ्या वयात नाही, म्हणजे तुम्हाला काय म्हणायचे होते?”

त्याने उत्तर देण्यापूर्वी त्यांनी सिगरेटी पेटवल्या. माझ्या कल्पनेप्रमाणे, तुझ्या वयामुळे, तुझ्याकडे खूप प्रेम चालून येते. तुला त्यासाठी मऊ चामड्याचे बूट घालायची जरुरी नाही.”

“नाही?”

त्याने तिचा अभ्यास केला. व मग मान हलवली. तो म्हणाला, “नाही.” नंतर तो क्षणभर थांबला आणि नंतर जे काही बोलणार होता, ते बोलला नाही. त्याने त्याचा अर्धपेला संपवला. आणि मग गप्पाटप्पांकडे वळला. “तू हिवाळ्यात सहसा कुठे जातेस?”

“सहसा मी शाळेत असते.”

“अरे देवा, मला वाटले होते तू वयाने लहान आहेस, पण इतकी लहान असशील, असे वाटले नव्हते. तू यावर्षीच शाळेतून बाहेर पडली असावीस, असे मला वाटले.”

ती म्हणाली, “मागील उन्हाळ्यात.”

मागील उन्हाळ्यात? तू लाँग आयलंडची आहेस का?”

ती म्हणाली, “हो.”

तो म्हणाला, “तू नक्कीच श्रीमंत घरातील असावीस. ओहो, नक्की. तुझे वडील बहुधा हरमन ट्रेसी असावेत.”

ती म्हणाली, “हो.”

“मग तुला फक्त कर सोडून, काळजीचे काही कारण नाही. सर्व चंगळच असणार. इथे कार्ल शेफर्ड कुठे बसतो? जर मी फार प्रश्न विचारत असेन, तर मी तसे नेहमीच करतो. कार्लशी तुझा काही संबंध नाही ना?”

ती म्हणाली, “नाही.”

तो म्हणाला, “यामुळे बऱ्याच प्रश्नांची उत्तरे मिळाली.”

ती बोलली, “असे आहे का? छान.”

तो हसला. “तू म्हाताऱ्या फॉदरगिलबरोबर खट्याळपणा करू नकोस. जर मी तुझ्या वयाचा असतो, तर मला तू जन्मायच्या आधी कार्ल माहिती असता. आणि जर ते बरोबर नसेल, तर मी फक्त एकदोन वर्षाने चुकत असेन. खरे का? आता मी तुझा भाऊ कधी येतो आहे, याचा तर्क करत नाही.”

त्याने दरवाज्याकडे पाहिले. “ठीक आहे. आता मी ते करतो. आता थोड्याच वेळात, तो लहानशा एमिलीला आणत असेल. तो हॉलीवूडच्या हॅनो लोकांमध्ये स्वतःशीच बोलत असेल. मी असे समजतो, की तुझा भाऊ कठीण परिस्थिती हाताळू शकतो.”

“असे कसे काय म्हणता?”

“ठीक आहे. तुझा भाऊ इथे येण्यापूर्वी, आमचा अभिनेता मित्र एमिली बरोबर ठीक वागत होता. कठीण परिस्थितीचा तो अर्थ आहे. मिस्टर हॉलीवूड हा वाईट अभिनेता आहे आणि हेच मी परतदेखील सांगेन.

“जॅक चांगला मारामारी करणारा आहे.”

डॉक म्हणाला, “मग हे ठरले. बहुधा तो येथील पार्टीसाठी योग्य असावा.”

“मी अशी आशा करते.”

डॉक म्हणाला, “नाही. तुम्ही अशी आशा करू नका. दारवानानने डॉकचा रिकामा पेला उचलला. मेरीने मान हलवली. कोणीतरी उठले आणि फोनोग्राफ सुरु केला. त्यामुळे मेरी आणि डॉकमध्ये शांतता प्रस्थापित झाली. ती वळली आणि तिने त्याला तिच्याकडे बघतांना पाहिले. तो हसला.

“तू खूप सुंदर आहेस, एवढेच.”

ती म्हणाली, “आभारी आहे.”

“एवढेच नाही. मला तुझ्याबद्दल अजून बरेच काही जाणून घ्यायचे आहे.”

ती म्हणाली, “विचार.”

‘नाही. मला काय जाणून घ्यायचे आहे, ते तू विचारु नकोस. आणि ते जाणूनही माझे काही भले होणार नाही आहे.”

“नाही?”

दारवानाने डॉकला पेय आणून दिले. त्याने ते जोरात प्यायले आणि सावकाशीने खोलीभर व बाहेरील दाराकडे पाहिले. दोन जोडपी नाचत होती. त्यांनी एकमेकांना घट्ट जवळ धरले होते. मेरी जेव्हा मेजवानीत सामील झाली, तेव्हा दोन खोल्यांमधील संभाषण शांत राहिले. डॉक पुढे झुकला आणि त्याने मेरीकडे त्याचे तोंड होईल, असे डोके वळवले.

“ती बोलली, “काय?’

मी तुझे चुंबन घेण्यासाठी माझ्या आयुष्याचे एक वर्ष देईन. तुला सांगतो, पुढचे वर्ष नाही. एक चांगल्यापैकी वर्ष.”

ती म्हणाली, “खरेच?“

“पण सोळा हजार कारणांसाठी, खरे तर त्याचा काही प्रश्न नाही. तेव्हा तू माझ्यावर अजून एक उपकार करशील का?”

ती म्हणाली, “मी तुझे चुंबन घेणार नाही.”

“ते नव्हे. दुसरे एक माझे व तुझेही काम आहे. तू कृपया तू येथून निघून, घरी जाशील का?” [तू अशा प्रकारच्या पार्टीसाठी योग्य नाहीस.]

ती बोलली, “ठीक आहे.” व उठून उभी राहू लागली. तो उठला व तिच्या हाताला स्पर्श केला. पण तिने तो झटकून टाकला व ती तिच्या भावाकडे गेली. घरी जाण्यासाठी त्याचे मन वळवायला एक मिनिट लागले. आणि असे करतांना तिने काय शब्द वापरले, ते त्याला ऐकू आले नाहीत. जेव्हा ते हॉलमध्ये आले, तेव्हा डॉक उठला.

तो म्हणाला, “मी तुम्हाला वाट दाखवतो.”

मेरी बोलली, “आभारी आहे. आम्ही ती शोधून काढू.” तो त्यांच्या मोटारीपर्यंत चालत गेला. “ट्रेसी, मला तुझ्या बहिणीला एक गोष्ट सांगायला आवडेल.”

“मला वाटते, तू आधीच फार सांगितले आहेस. हे जे काही चालले आहे, हे मला माहिती असते, तर मला तुझ्या नाकावर एक गुद्दा मारायला हवा होता.”

डॉक म्हणाला, “नक्कीच तसे करू नकोस. करायचा प्रयत्नही करू नकोस.” तो मेरीला म्हणाला, “फक्त एक गोष्ट लक्षात ठेव. तुला त्यासाठी चामड्याचे मऊ बूट घालून चालायची गरज नाही.”

जॅकने विचारले, “तो कशाबद्दल बोलतो आहे?”

मेरी म्हणाली, “त्याच्याकडे कोण लक्ष देते आहे?

अनुवादिकेची ओळख

# डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे एक्केचाळीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.


कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.


सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.


संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५

# वृषाली जोशी यांची चाळीस पुस्तके

ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)













ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha Christrie*

















ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha*
*Christrie*


























वृषाली जोशी
स्टीफन झ्वाइग
बुद्धिबळाची गोष्ट

वृषाली जोशी
लिओ टॉलस्टॉय
The Death of
Ivan Ilych
इव्हान इलयीचचा मृत्यू

वृषाली जोशी
चार्ल्स डिकन्स

वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov

कत्तल करायची मेंढी
व इतर कथा
रोआल्ड डाल
वृषाली जोशी
"Personally, I think it's...right under our noses."

वृषाली जोशी
मार्क ट्वेन

वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
लघुकथासंग्रह

वृषाली जोशी
लिओ टॉलस्टॉय
लघुकथासंग्रह

वृषाली जोशी
स्टीफन लिकॉक



वृषाली जोशी
विश्वकथा१



वृषाली जोशी
विश्वकथा-२



वृषाली जोशी
विश्वकथा-३


वृषाली जोशी
विश्वकथा-४


वृषाली जोशी
The SOUND OF MUSIC
संगीताचा नाद


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI


THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE



वृषाली जोशी
THE SHAKESPEARE STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado about Nothing
Twelfth Night






शेरलॉक होम्स


भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक कराल ते पुस्तक उघडेल








**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष.**

**डॉ. वृषाली जोशी यांचे हे एक्केचाळीसावे पुस्तक.**

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची उंचावली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपलॆ साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे. त्यांनी आजवर ई साहित्यच्या वाचकांसाठी केलेल्या जागतिक साहित्याच्या अनुवादांची **दहा हजाराहून अधिक पृष्ठे** प्रकाशित झाली आहेत व तो एक विक्रमच आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही

अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४३), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४१), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३४), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१०), श्याम कुलकर्णी(११), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल

जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (६), अरविंद बुधकर (४) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।